


# माणूस

शनिवार
२४ मार्च १९७३
पन्नास पैसे

जाहिरातक्षेत्रातील 'दैनिक'
लैंगिकता, अश्लिलता....

संपादक
श्री. ग. माजगावकर

२४ मार्च १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा – अंक : बेचाळीस

## सप्रेम नमस्कार...

▫ माणूसमधील पुष्पा भावे लिखित 'घाशीराम कोतवाल'ची स्तुती वाचली. वाईटाला ठणकावून वाईट म्हणण्याचे धैर्य हल्ली फारच थोड्या लेखक, संपादक व समीक्षकात राहिले आहे. दुर्दैवाने माणूसनेही असे अपवादात्मक धैर्य दाखविलेले नाही.

पुष्पा भावे म्हणतात त्याप्रमाणे 'घाशीराम कोतवाल' हा भव्योदात्त नाट्यानुभव वगैरे काही नसून तेंडूलकरांच्या हिशेबी गिधाडी वृत्तीचा तो कळस आहे. ब्राह्मण समाजाची सध्याची दयनीय स्थिती त्यांच्या चांगलीच पथ्थ्यावर पडली आहे. त्यांना काहीतरी सनसनाटी करायचे होते. आपण लिहितो ते सत्य की असत्य, समाजाला हितकारक की अहितकारक, सभ्य की असभ्य असले क्षुद्र विचार त्यांना कधी शिवतही नाहीत. किडलेल्या सत्तापिपासू समाजाबद्दलच त्यांना लिहायचे होते तर ज्या समाजात समाजसेविकांवर बलात्कार करून त्यांना जाळण्यात येते त्याबद्दल त्यांना लिहिता आले असते. पण त्यामुळे संभाव्य सरकारी पुरस्काराला वगैरे ते मुकण्याचा धोका होता. सरंजामशाहीतला मराठा इतिहासाचा एखादा भाग त्यांनी निवडला असता व नाटकात दशावतारी पद्धतीने 'मराठा हरी' म्हणून पात्रे नाचत आहेत, मराठा स्त्रीची विटंबना झाली आहे असे दाखविले असते तर? छे! छे! अहो, भलतंच काय बोलता. त्याच दिवशी आपला अवतार संपला असता हे काय तेंडूलकरांना माहित नाही!

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

दशावतार पाहिजेत पण ते दुर्दैवाचे नकोत. उगीच लोकांचे × × कोण खाणार. त्यावेळी माधव वझे, प्र. ना. परांजपे, पुष्पा भावे यांसारखे खंदे समीक्षक नंतरच्या गदारोळात तेंडूलकरांच्या बाजूने उभे राहिले नसते. बुडत्या जहाजात उगीच कोण पाऊल ठेवील !

एका जातीचे नाव घेऊन पात्रे नाचतात हा समाजविघातक जातीयवाद आहे असा साक्षात्कार त्यावेळी पुष्पा भावेंना झाला असता. अमूक अमूक ऐतिहासिक व्यक्तीवर चिखलफेक करून त्यानंतर 'मी अनैतिहासिक दृष्टीने लिहले हो' असे म्हणणे म्हणजे तेंडूलकरांचा धूर्त मतलबीपणा व दुतोंडीपणा आहे असे त्यावेळी त्या म्हणाल्या असत्या. 'अमूक अमूक' जातीच्या स्त्रीचीच नव्हे तर सर्व स्त्री समाजाची विटंबना तेंडूलकरांनी केली आहे असा त्यांनी आरोप केला असता. 'ऐतिहासिक व्यक्तीवर अनैतिहासिक दृष्टीने चिखलफेक करणे हे जर क्षम्य आहे तर 'तेंडूलकर घराण्यातील एकाद्या थोर व्यक्तीवर एकाद्याने 'अनैतिहासिक दृष्टीने' चिखलफेक केली तर त्यांना तें चालेल काय ?' असा प्रश्नही कदाचित त्यावेळी पुष्पा भावेंना सुचला असता. पण असला काही घोर प्रसंग ओढवला नाही. एकूण समीक्षकांचे भाग्यच थोर ! टिंगल बामणांची आहे, विटंबना बामण स्त्रीची आहे, चिखलफेकही बामण व्यक्तीवर आहे. त्यामुळे फारच छान सोय झाली आहे. समीक्षण करताना कसं मॉडर्न, मॉडर्न वाटतं.

३ मार्च, ७३ वि. गो. वझे, कोल्हापूर

## कोणतीही व्यवस्था पूर्णांशाने समर्थ नसते

चंद्रशेखर मराठ्यांनी अनिल बर्व्यांच्या जाहीर सवालांना दिलेले उत्तर वाचून माझा चांगलाच गोंधळ उडाला. लेख मुद्दाम परत वाचला; पण पहिल्या गोंधळाच्या जंजाळापासून काही बाहेर पडता येईना, एकदा वाटलं चंद्रशेखर मराठे ज्याप्रमाणे प्रत्येक पत्रकाराला राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास यांच्याशी तोंडओळख करून घेण्याचा सल्ला देतात तसा त्यांनी खरं म्हणजे आपल्या प्रत्येक वाचकाला पण द्यावयास हवा होता. पण संपादक महाशय, माझ्यासारख्या सामान्य वाचकाच्या प्रतिक्रियेची तुम्ही उपेक्षा करणार नाही असं वाटतं. म्हणूनच माझे पुढील विचार लिहिण्याचे धाडस करीत आहे.

मराठे म्हणतात, 'सर्व सरकारी यंत्रणेचा घटक असलेल्या एखाद्या न्यायाधीशाला रामशास्त्री म्हणावयाचे; पण न्यायखात्याच्या नावाने खडे फोडावयाचे हे अयोग्य.' हे अयोग्य कसं हे मला खूप विचार करूनही समजत नाही. जवळजवळ प्रत्येक नियमाला अपवाद असतोच. त्या अपवादाचा कोणी उल्लेख

केल्यास ते अयोग्य कसे ?

मराठे म्हणतात, 'जर या देशात लोकशाही नाहीच असे बर्वे यांचं म्हणणं, तर ही मूल्ये व परंपरा आल्या कुठून?' मला वाटते बर्वे यांनी आपल्या लेखाच्या शीर्षकाला, 'या देशात खरीखुरी लोकशाही आहे काय?' हे नाव दिले असते तर मराठ्यांचे समाधान झाले असते. पण हा झाला शाब्दिक काथ्याकूट, त्यातून मौलिक काय बाहेर पडले ?

मराठे म्हणतात, पोलीसखाते, न्यायखाते व सरकार यांच्या अकार्यक्षमतेमुळे नष्ट होण्याएवढी लोकशाही विचारधारा कमकुवत नाही;' पण 'लोकशाही विचारधारा' हा शब्द वापरून मराठे फार मोठी गल्लत करत आहेत. चर्चा आहे ती भारतातील सध्या अस्तित्वात असलेल्या लोकशाही व्यवस्थेची, लोकशाही विचारधारेची नव्हे. (मराठे! आपण परांजपे यांना जे उत्तर दिलेत ते आठवते का ?).

मराठे म्हणतात, 'या अवाढव्य, निरक्षर देशात प्रौढ मतदानाद्वारे पाच निवडणुका झाल्याचे त्यांच्या कानावर नाही काय? याच भारतीय लोकशाहीने सत्ताधाऱ्यांना १९६७ मध्ये मतपेटीच्या सहाय्याने धडा शिकवला नाही काय? त्यांना अधिक लोकाभिमुख केले नाही काय?' इथे तर मराठ्यांनी कळसच केलाय. अगदी षटकारच मारलाय म्हणाना. भारतीय लोकशाहीचे मूल्यमापन त्यांनी अगदी भाबडेपणाने केले आहे. निवडणुका यशस्वी होणे हे लोकशाहीच्या यशस्वितेचे प्रधान मूल्य मानावयाचे तर खरोखरच आपण लोकशाहीच्या स्वर्गात आहोत म्हणावयाचे.

मराठे म्हणतात, 'सत्ता जनतेच्या पाठिंब्यातून जन्म पावते व मग तिच्या हाती बंदूक असते.' कबूल पण हा जनतेचा पाठिंबा मिळवण्याचे अनेक मार्ग असू शकतात. त्यातील एक नक्षलवाद. अशिक्षित शेतकऱ्याला निरनिराळ्या पक्षांच्या समाजवादातील सूक्ष्म फरक समजावून देऊन योग्य तोच समाजवाद निवडण्याची पात्रता त्याच्या अंगी निर्माण करणे किती अशक्यप्राय गोष्ट आहे हे मराठ्यांना कोणी सांगावयास हवे काय? अशिक्षित शेतकरी कशाला, स्वतःला सुशिक्षित म्हणवणाऱ्यांच्या डोक्यातही ह्याबाबत किती गोंधळ असतो (खुद्द माझ्याही आहेच) ह्याची त्यांना कल्पना असेलच. अशा परिस्थितीत नक्षलवादाचे सरळ, सोपे तत्त्वज्ञान त्याला सांगून शक्य तितक्या जलदगतीने क्रांतिकारक बदल घडवून आणावयाचे कोणी स्वप्न पाहिले तर तो अगदी नालायक ठरतो काय ?

मराठे म्हणतात, 'बळी तो कान पिळी हा मोठा क्रांतिकारक विचार नसून आदिमानवी विचार आहे' पण लोकशाहीने मानवाला ह्या विचारापासून परावृत्त केले आहे (निदान भारतात तरी) असे समजणे म्हणजे डोळ्यावर झापड ठेवून वावरण्यासारखे आहे. उलट ह्या लोकशाहीच्या जमान्यात बळाचे स्वरूप इतके गुंतागुंतीचे (Complex) झाले आहे की स्वतःचा

नैतिक अध:पात केल्याशिवाय ते तुमच्या हाती लागणे शक्य नाही.

मराठ्यांचे लेखन मला आवडते. खूप विचारप्रवर्तक वाटते. पण त्यांच्या ह्या लेखाने माझी खूप निराशा केली. काही काही वेळा टीका त्यांनी इतक्या खालच्या पातळीवर आणली आहे, की तिला वैयक्तिक हेव्यादाव्यांचा वास येतो. हे कदाचित खरे नसेल पण तशी माझी समजूत मात्र झाली आहे.

बर्व्यांच्या मूळ जाहीर सवालांबद्दल म्हणावयाचे तर ते डांगोरा पिटतात तेवढी काही लोकशाहीची दुरावस्था ह्या देशात नाही. पण परिस्थिती हलकेहलके बिघडण्याची लक्षणे जरूर दिसत आहेत. कोणतीही व्यवस्था पूर्णांशाने आदर्श असणे शक्य नाही. त्याप्रमाणे लोकशाही व्यवस्थेकडून वाजवीपेक्षा जास्त अपेक्षा करणे योग्य नव्हे. पण ज्या काही उणीवा आहेत किंवा शिरू पहात आहेत (त्या कोणाला मोठ्या वाटोत, कोणाला छोट्या वाटोत) त्यांची जाहीर चर्चा होणे आवश्यक आहे. विचारवंतांनी त्यावर मूलगामी भाष्य करून काही उपाय सुचवावेत ही माझ्यासारख्या सामान्य वाचकाची अपेक्षा.

२४ फेब्रुवारी, ७३ एम. जे. शिर्के,
चिपळूण

# निरोगी लोकशाहीचा कणा

श्रीयुत अनिल बर्वे यांनी विचारलेल्या बारा जाहीर सवालांना मी जे उत्तर दिले त्याला अनुलक्षून आतापर्यंत चार पत्रे आली आहेत.

पैकी खुद्द अनिल बर्वे यांच्या पत्रात मी दखल घ्यावी असे काही नाही असे खेदाने म्हणावे लागते. एवढेच म्हणतो, की एकाची प्रत्यक्ष ओळख असल्याशिवाय त्याचे ज्ञान, विचारांचा कल, उद्देश हे कळणे शक्य नाही. हा बर्व्यांचा सिद्धांत स्वीकारला तर वैचारिक चर्चेत फार अनवस्था प्रसंग येईल. एकाद्याचे लेखन (विशेषत: ललितेतर लेखन) हेच वरील सर्व गोष्टी जाणून घेण्याचे साधन आहे असे माझे नम्र मत आहे.

इतर तीन पत्रलेखक — देशपांडे, खांडेकर व शिर्के यांचे लेखन व विचारांची दिशा प्रामाणिक वाटते. म्हणून त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना (काही फसवेगिरी न करता) थोडक्यात खाली हाताळीत आहे.

या तिघांची अशी समजूत झाली आहे, की बर्वे यांचा व माझा काही हेवादावा आहे. तसे काही नाही. हेवादावा असलाच तर तो एवढाच की, ‘बर्वे सत्ता बंदुकीच्या नळीतून जन्म पावते’ या सिद्धांतावर श्रद्धा ठेवतात व माझा या सिद्धान्ताला पूर्णपणे विरोध आहे. या सिद्धांताच्या पाठीराख्या मंड-

पृष्ठ ५६ वर

# सखाराम दो राहा आणि दैनिके

सौ. शकुंतला फडणीस

एकूण सखाराम बाइंडर भलतीच धमाल माजवून राहिलाय. सखाराम-वर आजपर्यंत इतकी चर्चा झाली की, कदाचित खुद्द तेंडुलकरांनाही आता कंटाळा आला असेल! पण पब्लिकचा उत्साह उदंड. पुन्हा पुन: अस्तन्या सर-सावून माणस त्यावर तुटून पडताहेत. उलट सुलट बोलत आहेत. पत्रव्यवहार करीत आहेत. सखारामच्या संदर्भात 'दो राहा' किंवा 'ब्लो हॉट ब्लो कोल्ड' या चित्रपटांचा वरचेवर उल्लेख होतो. सखारामचे विरोधकच नव्हेत तर पुरस्कर्तेही हा उल्लेख करतात.

दो राहासारखे चित्रपट चालतात, मग सखारामवर तेवढी बंदी का? हा युक्तीवाद केवळ बालिश आहे. 'त्यांचे तेवढे चालते, आमचे मात्र नाही' असे म्हणणे म्हणजे ते चित्रपट आणि हे नाटक एकाच पातळीवर आहेत अशी कबुली आहे.

हे चित्रपट किंवा हे नाटक, अश्लील असेल किंवा नसेल. त्याचा संबंध समाजातल्या काही मोजक्या लोकांशी येतो. हे प्रेक्षक किमान चौदा पंधरा वर्षांचे (A चित्रपटाला सोळा वर्षाचा नियम आहे.) तिकिटासाठी दोन-चार रुपये खर्च करू शकणारे आणि चोरून किंवा उघडपणे नाटक-सिनेमा बघू शकणारे असे असतात. एकूण लोक-संख्येच्या मानाने या प्रेक्षकांची संख्या अल्प असते. शिवाय यातले बहुसंख्य प्रेक्षक सज्ञान असतात. असा एखादा चित्रपट किंवा नाटक बघितल्याबरोबर त्यांचे पूर्वीचे संस्कार साफ धुतले जातील आणि नीतीमत्ता सपशेल ढासळेल अशी शक्यता बहुधा कमी.

पण सखाराम अथवा दो राहालाही मागे टाकतील अशा जाहिराती रोजच्या

दैनिकात येत असतात त्यांचे काय? या जाहिरातीही मोठमोठ्या, सचित्र आणि सुप्रसिद्ध कंपन्यांच्या मालासाठी असतात. दैनिक ही कौटुंबिक वस्तू मानली जाते. नुकते लिहू वाचू लागलेल्या लहान मुलांपासून 'तो म्हाताऱ्या आजोबांपर्यंत सर्वांना दैनिक हवे असते. कामगारवर्गसुद्धा रोजचे दैनिक विकत घेऊन वाचतो. समाज-शिक्षणाचे साधन याच दृष्टीने भारतीय दैनिकांकडे पाहिले जाते. अशा परि-स्थितीत 'मुलांपासून अंक लपवून ठेवावा' असे सर्वसाधारण पालकांना वाटण्यासारख्या जाहिराती दैनिकात याव्यात का? जाहिरातींना अश्लीलतेचा कायदा लागू नाही का? की आता दैनिकालाही 'ए' आणि 'यू' अशी शिफारसपत्रे द्यायची?

अश्लील अथवा आक्षेपार्ह जाहिरातींत पहिला क्रम चित्रपटाचा लागेल. त्यातल्या त्यात इंग्लिश मॅटिनीचा. नायिकेच्या सौंदर्याचे, तिच्या अत्यल्प वस्त्राचे, नायक-नायिकेच्या प्रेमाचे वगैरे गरम किंवा सेक्सी, सवंग वर्णन आणि सेन्सॉरच्या कात्रीतून कसेबसे सुटलेले धुंद, प्रणयी, उन्मादक चित्र अशा मज-कुराच्या या जाहिराती असतात. (सामान्यत: मजकूरही बरेचदा सारखा असतो.) अगदी 'केसरी'सारख्या दैनिकातसुद्धा असल्या जाहिराती येतात.

अठरा-वीस वर्षांच्या विद्यार्थ्यां-साठीच अशा जाहिराती बेतलेल्या असतात. विद्यार्थी तासाला दांडी मारून असल्या पिक्चरला जातात यापेक्षाही, त्याच विद्यार्थ्यांची अजाण वयाची भावंडे अशा जाहिराती वाचतात हा मुद्दा चिंतनीय आहे. असल्या उत्तान जाहिराती आपल्या लहान लहान भावंडांनी बघाव्यात असे त्या सिनेमाला चोरून जाणाऱ्या मुलांनाही वाटणार नाही! संस्काराच्याच दृष्टीने विचार केला तर मोठ्या मुलांपेक्षा लहान मुलांना जपणेच अधिक जरूर आहे. एखाद्या घराला आग लागली तर ती आग विझवण्याबरोबरच, आजूबाजूची घरे वाचवणे, वेळ पडल्यास थोडी पाडापाड करूनसुद्धा शेजारची घरे सुरक्षित ठेवणे जरूर असते!

चित्रपटाला 'ए' सर्टिफिकेट अस-ताना, त्याची उत्तान जाहिरात, सोबत एखादा उघडावाघडा फोटो दैनिकात छापणे हे कायद्याच्या चौकटीत कसे बसते? किंवा सार्वजनिक जागी, प्रचंड आकारात लावलेली उथळ कामुक पोस्टर्स-(उदा. जिगरी दोस्त, अनमोल मोती, बाबुल की गलिया) ही जाहिरात-पद्धत कायद्याच्या कक्षेत बसते का? वास्तविक इंडियन पीनल कोडाच्या २९२ आणि २९३ कलमांप्रमाणे हा गुन्हा आहे. पण असा हा अश्लीलतेचा गुन्हा सर्रास घडत असतो आणि त्याला कोवळ्या वयाचे तरुण बळी पडत असतात.

श्री. दि. बा. मोकाशी यांनी त्यावर इलाज सुचवला आहे. कामशास्त्राच्या अभ्यासाने विकृती दूर होऊन, तरुण मुलांना निकोप वातावरण मिळेल, आणि बीभत्स किंवा उत्तान बोलणे,

लिहिणे किंवा वागणे हे प्रकृती-स्वास्थ्याला हानिकारक आहे हे मुलांना कळून येईल असे मोकाशींनी म्हटले आहे. त्यांचे म्हणणे खरे आहे. परंतु कामशास्त्राचा अभ्यास आणि त्याचे इष्ट परिणाम यासाठी आपल्याला खूपच काळ तिष्ठावं लागेल. पूर्वी कामसूत्रावर मोकळेपणी चर्चा होई, ते धर्मबाह्य किंवा चावटपणाचे समजले जात नव्हते. पण तो काळ फार प्राचीन होता. त्या काळाशी किंवा वृत्तीशी सांगड घालण्यासाठी आजच्या समाजाला बऱ्याच पल्लेदार उडया माराव्या लागतील. शिवाय, त्या दरम्यान, या विकृत आणि कोंदट वातावरणात कोवळे जीव गुदमरत राहतीलच.

श्री. मोकाशींनी 'मनोहर'मधील एका फोटोचा उल्लेख केला आहे. एका स्त्रीला मांडीवर घेऊन एक पुरुष बसला आहे वगैरे. मी हा फोटो पाहिलेला नाही. पण तो फोटो पाहून मोकाशींना धक्का बसला त्याअर्थी समाजातल्या सुजाण आणि सुसंस्कृत नागरिकांपैकी पुष्कळांना तो फोटो धक्कादायक वाटू शकेल. रामपंचायत आणि वामांकारुढ-सीता असे रामाचे चित्र कैक भितीवर लटकलेले आहे. पण ते कुणालाही खटकत नव्हते. हे चित्र लहानपणापासून अनेकांनी देवघरात पाहिलेले आहे. पण रामपंचायतनात राम, सीता, किंवा इतर मंडळी यापैकी कुणाच्याही चेहऱ्यावर प्रसन्न सात्विकतेशिवाय दुसरा भाव नाही. अश्लीलता ही कलाकृतीत किंवा चित्रात नसते तर ती बघणाऱ्याच्या डोळ्यात असते असे समर्थन बरेचदा केले जाते. ते मला कधीच पटलेले नाही. उलट मला तर वाटते, की अश्लीलता ही बघणाऱ्याच्या डोळ्यात नसून चित्रातल्याच डोळ्यात असते. चित्रात काय आहे यापेक्षा ते कशा पद्धतीने आणि कोणत्या हेतूने काढले आहे याचे स्पष्ट प्रतिबिंब चित्रातल्या डोळ्यात उमटलेले असते.

आणि म्हणूनच, ज्यावेळी कुठल्याही कारणाशिवाय अथवा संगतीशिवाय अल्प वस्त्रातल्या स्त्रीचे किंवा विवस्त्रतेचा भास असणाऱ्या स्त्रीचे चित्र जाहिरातीत छापतात त्यावेळी विचार करणे भाग पडते. उदा. नीविया क्रीम किंवा सिथॉल साबण. ही दोन्ही उत्पादने तशी लोकप्रिय आहेत; आणि त्यांची दर्जेदार जाहिरात करणे शक्य आहे. परंतु नीविया क्रीमची किंवा सिथॉल साबणची 'वस्त्रकपात' सर्रास केली जाते. सौंदर्यप्रसाधने आणि स्त्रीदेह यांचा असा संबंध दाखविण्याची गरजच आहे का?

बरे, जिथे दूरान्वयानेही संबंध पोचत नाही, तिथंसुद्धा अशी चित्रे छापूनच जाहिरात का सजवावी? कॉमेट ऑटो-बल्ब किंवा परॅशूट कार्डची जाहिरात करताना कमीत कमी कपड्यांचा काही संबंध आहे का? पण गरवारे नायलॉन्सची जाहिरात बघा. (तरुणी विमानातून उडी मारते.) १४॥ × ३१॥ सें. मी इतक्या मोठ्या आकारात ही छापली जाते. (अन् तसाच विचार केला तर चित्रातल्या तरुणीवर विमाना-

तून उडी मारण्याचा प्रसंग कधी येईल का ?) गरवारे नायलॉन्सची आणखी एक जाहिरात लोकसत्तेत एकदा आली होती. चित्रातल्या तरुणीने शंभराची नोट कमरेभोवती गुंडाळली आहे, वरचा भाग हातांनी किंवा केसांनी अर्धवट झाकलेला आहे वगैरे.

विजेचे पंखे, ट्रान्झिस्टर वगैरेच्या जाहिरातीतून, कमीअधिक प्रमाणात असला फॉर्म्युला वापरला जातो. पण चावट जाहिरातींची चढाओढ दिसते ती कापड कंपन्यांकडून. काही दिवसांपूर्वी बॉंबे डाइंगच्या साड्यांनी बऱ्याच सनसनाटी जाहिराती गाजवल्या होत्या. बिन्नीसारख्या कंपनीनेसुद्धा जाहिरातीसाठी चक्क चुंबनदृश्य छापले होते. महाराष्ट्र टाइम्समध्ये ही जाहिरात २० X ३० सें. मी. इतक्या मोठ्या आकारात छापलेली होती. आता बिन्नी किंवा बॉंबे डाइंग यांचा माल सुप्रसिद्ध आहे, चोखंदळ गिऱ्हाईके त्यांच्या मालाची मागणी करतात, आणि येनकेन प्रकारेण मालाचा उठाव व्हावा अशी त्यांची काहीही परिस्थिती नाही तरीसुद्धा त्यांनी असल्या जाहिरातींचा आश्रय का घ्यावा ?

अर्थात् हेही खरं की बिन्नी किंवा बॉंबे डाइंगच्या जाहिराती सोज्वळ वाटाव्यात असल्या जाहिराती कित्येक कापडकंपन्या करीत आहेत विशेषत:

---


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे
यांचा
नवा
कथा संग्रह

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन

टाइम्स ऑफ इंडियाने तर या बाबतीत जणू आघाडी उघडली आहे. बिन्नीच्या त्या जाहिरातीत चुंबनदृश्य आहे, पण त्यांनी व्यवस्थितीत अंगभर कपडे घातलेले आहेत. आणि जाहिरातीत हीनतेचे प्रदर्शन नाही. पण चार्मिलॉन साड्या (लक्ष्मी कॉर्पोरेशन) सारंगपूर फॅब्रिक्स, ठाकरसी फॅब्रिक्स, जयलेन (स्वदेशी पॉलिटेक्स) किंवा तेजिन यांच्या कित्येक जाहिरातीत कापडापेक्षा विवस्त्रतेचीच जाहिरात दिसते! कपड्यांच्या दुनियेत असला नागवेपणा कशासाठी?

चार्मिलॉन साडीच्या जाहिरातीतील तरुणीने अगदी अपुरी काचोळी घातली आहे आणि कमरेच्या खाली अन् गुढघ्याच्यावर Cost अशी पाटी धरलेली आहे. जयलेनच्या जाहिरातीतही ब्रा आणि पँटी हाच तरुणीचा पोशाख आहे. या दोघींचे इतपत तरी लज्जारक्षण केलेले आहे. पण सारंगपूर आणि तेजिनच्या नायिकांना तेवढेही वस्त्र मिळालेले नाही! आणि या अशा जाहिराती २२ × २९॥ सें. मी. या आकारात छापलेल्या आहेत!

हे सारे प्रकार कशासाठी! तर कापडाच्या जाहिरातीसाठी. ही त्याच्यातली आणखी विसंगती. स्त्रीच्या देहाचा बाजार किंवा विटंबना हे शब्द घासूनघासुन गुळगुळीत झालेत. पण हेच शब्द वापरणे भाग आहे. कारण त्याच्याइतके समर्पक शब्द खरोखर सापडणे कठीण आहे.

या जाहिराती काही 'विशिष्ट' मासिकातून असल्या तर गोष्ट जरा निराळी. अशी मासिके किंवा वृत्तपत्रे आपण मुलांपासून दूर ठेवू शकतो. अश्लील किंवा आक्षपार्ह नाटक सिनेमा-नाही कोणी लहान मुलांना पाठवीत नाही. त्याचप्रमाणे अश्लील पुस्तके, कथा कादंबऱ्यांपासूनही आपण त्यांना दूर ठेवू शकतो. पण रोजच्या दैनिकातून वरचेवर दिसणाऱ्या या जाहिरातींपासून लहान मुलांना कसे जपणार?

आणि ही आता सुरुवात आहे. याची लागण अशीच फैलावली तर? जाहिरात क्षेत्रातली वाढती स्पर्धा आणि त्यातून उद्भवणारी अपरिहार्यता लक्षात घेतली तर मोठ्यांच्या पाठोपाठ लहान कंपन्याही उद्या असल्याच जाहिराती करू लागतील! स्त्रीदेहाचं दर्शन घडणं याला महत्त्व नाही. स्त्रीत्वाचं उत्तान प्रदर्शन घडवणे, विकृत कुतूहल चाळवणे किंवा असल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करणे हे कितपत योग्य ठरेल?

जर अश्लीलतेविरुद्ध चळवळ करायची असेल तर अगोदर अजाण मुलांच्या डोळ्यात धूळ घालणाऱ्या असल्या जाहिराती थांबवणं जरूर आहे. शिवाय बहुजनसमाज हाही लहान मुलासारखाच कोवळ्या बुद्धीचा असतो. असल्या भडक जाहिराती सतत बघितल्यानं मुलांच्या मनात विकृती निर्माण होतील अन् मनोविकृतीचे परिणाम एखाद्या नाटकसिनेमापेक्षाही भयानक होऊ शकतात.

● ● ●

# कलकत्ता मेल

## सौ. तारा पंडित

### जीवन आणि शिक्षण

अलका गणित शिकायला माझ्या घरी यायची. एकदा स्टॅटिस्टिक्समधला एक फॉर्म्युला मला आठवला नाही. त्यावेळी पुस्तक हाताशी नव्हतं. मला रमेशची आठवण आली. समोरच्याच फ्लॅटमध्ये राह्यचा तो. त्यावेळी नुकतीच बी. कॉम. ची परीक्षा दिली होती त्याने. गणिताचा पेपरही मला दाखवला होता.

मी रमेशला म्हटलं–' तेवढा फॉर्म्युला मला आठवत नाही. सांगतोस का जरा ?'

' मला आता आठवणार नाही. ' – रमेश उत्तरला.

' अरे, तुझ्या पेपरमध्ये तर त्यावरच प्रश्न होता. परीक्षेत नुकतंच काय लिहीलंस ते आठवत नाही तुला ?'

' कुणास ठाऊक परीक्षेत मी काय लिहीलं ते. आता मला आठवणंच शक्य नाही. '

' आश्चर्य आहे बरं पुस्तक दे स्टॅटिस्टिक्सचं. मी पाहून घेईन. ' – मी म्हटलं.

' पुस्तक ? कोण जाणं कुठल्या अडगळीत पडलंय् ते. सापडणं कठीण आहे. रमेश म्हणाला.

मला फार आश्चर्य वाटलं. अजून परीक्षेचा निकाल लागायचा होता. त्याआधीच पुस्तकं गायब,

पण म्हणून काही बिघडलं नाही. रमेशने बी. कॉम्. ची डिग्री मिळवली. त्या डिग्रीशीही त्याला तसं कर्तव्य नव्हतं तो उत्तम सितार वाजवायचा. त्याला रविशंकर बनायचं होतं. शिवाय फ्रेंच शिकायचा. कारण फ्रान्समध्ये जाऊन वास्तव्य करायचं होत.

एकदा कशी कोण जाणे, चंद्रकांत बक्षींशी त्याची ओळख झाली. आणि त्याचं ध्येय बदललं तो लेखक झाला. ' केसुडा 'त छापून आलेल्या कथेला ५०० रु चं बक्षीस मिळालं आणि लगेच त्याच्यातला स्वतंत्र लेखक अंतर्धान पावला. आता तो सिनेमाचे संवाद लिहायला शिकतोय्. इकडे रजनीशांची प्रवचनं ऐकून हिमालयात जाण्याचे विचारही करतोय्. तो आईला म्हणतो– ' मी हिमालयात जाणार आहे. दहा वर्षं राहीन तेथे. मग मात्र वर्तमानपत्रही उघडून बघणार नाही. उगाच जगात काय चाललंय् ते कळलं तर मध्येच परत फिरायचा मोह व्हायचा. '

असा हा रमेश. त्याच्या जीवनाशी त्याच्या शिक्षणाचा काही एक संबंध नाही. शिक्षणाची लाईन वेगळी आणि जीवनाची दिशा अजिबात निराळी, सारखी प्रवाह बदलणारी. मग त्याने शिक्षण घेतलं तरी कशाला ? रमेश-

सारखे विद्यार्थी कशासाठी शिकतात? कशासाठी डिग्री मिळवायची धडपड करतात? ह्या प्रश्नाचं उत्तर मलाही ठाऊक नाही! ●

## दूर दृष्टी

तिकडे आसाम आणि आंध्र प्रदेशात धुमाकूळ माजला असताना त्याच सुमारास गांधीजींच्या पुण्यस्मरणाचे दिवशी पश्चिम बंगालचे मुख्य विचारपती (चीफ जस्टिस्) श्री. शंकरप्रसाद मित्र यांच्या अध्यक्षतेखाली एक सुंदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यात सर्व धर्मांच्या प्रार्थना आणि सर्व भाषांमधून भजने म्हटली गेली. तुकारामाचं एक भजन महाराष्ट्रीय मुलींनी म्हणून मराठी भाषेचे प्रतिनिधित्व केले. रविंद्र संगीत (त्याशिवाय कोणताच कार्यक्रम होऊ शकत नाही) आणि नझरुल गीतांचाही समावेश होताच. सुरुवातीला आपल्या मधुर आवाजात 'आर्य भुवनमनमोहिनी' हे रविंद्रसंगीत तल्लीन होऊन गाणारा गौतम बंडोपाध्याय याच्याशी मुद्दाम ओळख करून घेतली व त्याला घरी बोलावलं. एक दिवस तो खरोखरीच आला. स्वतःबद्दल त्याने बरीच माहिती सांगितली. वयाच्या ६ व्या वर्षापासून गातो आणि आता गाणं म्हणूनच पैसा कमवतो इ. 'तू शिकलाच नाहीस?' ह्या प्रश्नाचं त्याने होकारार्थी उत्तर दिलं. बी. ए. च्या तिसऱ्या वर्षात असताना कॉलेज सोडलं म्हणाला. आता त्याचा शिक्षणावरचा विश्वासच उडाला आहे. डिग्री मिळवून तरी काय विशेष फरक पडणार आहे? जे बेकार बी. ए. आहेत त्यांच्या संख्येत भर पडेल एवढंच. त्यापेक्षा आपली कलासाधनाच सुरू ठेवली तर अधिक चांगलं. थोडासा पैसा मिळतो. बराचसा आनंद मिळतो. असं गौतमचं मत आहे. आजच्या शिक्षणाने आयुष्य नुसतंच फुकट जातं असं तो म्हणतो. शिवाय 'आम्ही पॉलिटिक्स खेळून बदनाम झालो, फार नुकसान करुन घेतलं' या विचाराबरोबर त्याने हळहळ व्यक्त केली. आजचा विद्यार्थीही व्यवस्थित शिक्षण घेत नाही, स्वतःची व इतरांची देखील फसवणूक करीत असतो म्हणून त्याला वाईट वाटलं. तो म्हणाला – आजच्या विद्यार्थ्यांना एक इंग्रजी वाक्य धड लिहिता येत नाही, यांना कोण नोकरी देणार? पुढची शिक्षकांची पिढी यांच्यातूनच निर्माण होणार आहे ना? यांनाच जर काही अभ्यास येत नाही, हे शिक्षक होणार तरी कसे आणि विद्यार्थ्यांना शिकवणार तरी काय? कदाचित् नजिकच्या भविष्यात आपल्या देशात शिक्षकांचाच अत्यंत तुटवडा भासण्याची शक्यता आहे!...... ●

## गारगोट्या आणि हिरे

'University education polishes the pebbles and dims the diamonds' ह्या विषयावर एक परि-

संवाद झाला. त्यात प्राध्यापकांनी आणि विद्यार्थ्यांनी आपापली बाजू मांडली. एका प्राध्यापकांनी विवेकानंदांच्या वक्तव्याचा आधार घेऊन म्हटले की शिक्षणाचा मूळ उद्देश अत्यंत पवित्र असून त्या क्षेत्रात सर्वांना समदृष्टीने पाहणेच अत्यावश्यक आहे. तेथे ढ आणि हुषार किंवा गारगोटया व हिरे असे भेदभाव करणे गैर आहे. याशिवाय जे खरोखरीच बुद्धिमान असतात त्यांच्या मार्गात कोणीही अडथळे निर्माण करू शकत नाही, विद्यापीठ देखील नाही !

आणखी एक प्राध्यापक म्हणाले, विद्यापीठची अडचण अशी की विद्यापीठात जास्तीत जास्त भरणा गारगोटयांचा असून जे हिरे आहेत ते अगदी अलिप्त आहेत. कारण त्यांना रचनात्मक सामाजिक संस्थांमध्ये प्रकाशण्यासाठी पुरेसा वावच मिळत नाही.

कॉलेजच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अध्यापकांचे दोष दाखवले. ते आपली कर्तव्ये बरोबर बजावीत नाहीत म्हणूनच आम्हा विद्यार्थ्यांना सध्या शोचनीय दशा अनुभवावी लागत आहे; त्यामुळे विद्यापीठ म्हणजे केवळ गारगोटयांचा एक समूह झाला आहे, यापेक्षा अधिक काही नाही, असे विद्यार्थी वक्त्याचे मत.

भारतातील शिक्षणपद्धतीवर विवेकानंदाच्या काळापासूनच टीका होत आहे. त्यांनी स्वतःही फार कडक टीका केली आहे. Philosophy of Education मध्ये ते म्हणतात की परक्यांचे विचार मेंदून ठासून भरायचे आणि डिग्री मिळवायची म्हणजे काही शिक्षण नव्हे. कारण व्यक्तिगत आणि राष्ट्राच्या विकासासाठी त्याचा काहीही उपयोग होत नाही.

अगदी अलीकडे प्रा. मिर्दाल नावाच्या ऑस्ट्रेलियन शिक्षण तज्ज्ञाने येथील शिक्षणपद्धतीचा सूक्ष्म अभ्यास करून म्हटले की ' भारतात विद्यार्थ्यांना दिले जाणारे शिक्षण हे पाश्चात्य पद्धतीवर आधारलेले असल्यामुळे भारताच्या दृष्टीने अगदीच कुचकामाचे आहे. देशातील गरजानुसार शिक्षणपद्धती आखण्यात यावी इ. '

इतर लोक आता आमचे डोळे उघडून देत आहेत. पण आम्ही स्वतः आपले डोळे केव्हा उघडणार कोण जाणे !

● ● ●

जिल्हा : ठाणे
तालुका : डहाणू
मुक्काम : देदाळे
स्थळ : ग्रामपंचायत
९ फेब्रुवारी संध्याकाळ...

# रऊ आणि जया

प्रभाकर म्हात्रे

'मला एकटीला कोंडून पोलिसांनी लुगडे सोडले आणि छातीवर हात टाकला, स्तन ओढली, विटंबना केली.' मध्ययुगीन काळातील एखाद्या सरदार सुलतानाने एखाद्या खानदानी घरात जबरीने आणलेल्या तरुण सुनेची ही आर्त किंकाळी नाही. अथवा चित्तथरारक नाटकातील रहस्यमय प्रसंगातील नायिकेचे हे भाषणही नाही.

१९७३ सालातील फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्याच्या सुरुवातीला डहाणू तालुक्यातील देदाळे या गावी एका वारली कुटुंबावर नाईक सरकारच्या पोलिसांनी अनन्वित अत्याचार केले. नंतर घडलेल्या शोकांतिकेवर अखेरचा पडदा पडण्यापूर्वीचे हे भीषण उद्गार आहेत रऊबाईचे. रऊबाई ही त्या दुर्दैवी शोकांतिकेतील बळी आहे.

देदाळे : एक छोटासा गाव. वाणगाव स्टेशन ५ll-६ मैलावर तर चिंचणी तारापूर या सुधारित गावापासून ४ll मैलावर हे गाव आहे. वस्ती मिश्र. आदिवासी बहुतांशी मजूर म्हणूनच आहेत. रामा वळवी हा देदाळचा शेतमजूर वारली आहे. चूरी नावाच्या सधन शेतकऱ्याकडे तो मजूरी करतो. कुटुंबात ६।७ माणसे आहे रामाच्या. आजच्या कथानकातील नायिका रऊ ही रामाची मुलगी होती.

रऊच्या घरात अलिकडे चमचमीत मसाल्याच्या खमंग फोडणीचे वास वाऱ्यावर जवळपास पसरू लागले होते. नेहमीच सुके बोंबील आणि भात पोटात ठेचणाऱ्या वारल्यांच्या घरात खमंग फोडणीचा वास येताक्षणी गावातील खादीधारी पुढाऱ्यांनी एकदम धसका

घेतला. साधारणतः आदिवासी भागातील हे एक मानसशास्त्र आहे. सधन आणि सुखवस्तू पुढाऱ्याला आपले पुढारपण आणि संस्कृती कायम टिकून राहण्यासाठी दरिद्री आदिवासी दरिद्रीच राहावा असे मनोमन वाटत असते. नव्हे गरिबी हटावचे पुढारीपण टिकविण्यासाठी त्याला आदिवासींचे दारिद्र्य हे भांडवल म्हणून उपयोगात आणावयाचे असते.

रऊच्या घरातील फोडणी एका पंचायत सदस्यांच्या काळजाला जाऊन भिडली. दुसरे एक खादीधारी देशभक्त. त्यांनाही रऊबाईच्या चुलीवरच्या फोडणीने बेचैन करून टाकले. रऊबाईकडे काहीतरी नोटांचा भारा आहे आणि तो आपण हस्तगत केला पाहिजे अशी दोघांच्याही जिवाला ओढ लागली. आदिवासी जगतात कुठच्याही निष्पाप जिवाला हैराण करावयाचे, प्रसंगी अब्रू लुटावयाची, जीव घ्यावयाचा तर शेट, सावकार, पुढारी आणि नेते यांचेकडचे हुकमी हत्यार म्हणजे पोलीस. पुढाऱ्यांनी 'हू' म्हणण्याची खोटी. पोलिसांनी पुढाऱ्याला पाहिजे ते भक्ष्य आणून दिलेच पाहिजे, असा इकडचा न्यारा रितीरिवाज आहे. असे कळते की, या पुढारी कंपनीने पोलिसांना सांगून रऊ आणि तीची भावजय जया यांना देदाळे गावच्या ग्रामपचायत ऑफीसमध्ये बोलावून घेतले. तो दिवस होता शुक्रवार, रथसप्तमीचा आदला दिवस. ता. ९।२।७३ चा. गणवेशधारी पोलीस १ : ठाकूर २ : नाचणे.

या दोन बायांवर वहिम काय? 'तुमच्याजवळ अपहरण केलेला पैसा आहे!'

देदाळे गावची ग्रामपंचायत कचेरी. पंचायत मिटींगमधील सदस्यांच्या हमरीतुमरीवरील भांडणाव्यतिरिक्त येथे गावातील भांडणे कधी येत नसतात असे देदाळचे लोक म्हणतात. गावातील झगडे काही असलेच तर सरपंच व पोलीस पाटलाचे घरीच मिटवले जातात. या प्रकारापूर्वी या गावात या ना त्या निमित्ताने पोलीस कधी आले नाहीत असेही नाही. पण ग्रामपंचायत ऑफिसमध्ये बसून पोलिसांनी बळाचा उपयोग करून घेतल्याचा प्रसंग मात्र देदाळे गावी यापूर्वी कधी घडला नव्हता, असे गावकरी ठासून सांगत होते.

या भागातील मार्क्सिस्ट कम्युनिस्ट कार्यकर्ते आणि किसानसभेचे नेते श्री. धनगर यांचे म्हणणे आहे, पोलिसांनी थर्ड डिग्री ट्रिटमेंट देण्यास सुरुवातीपासूनच प्रारंभ केला तोच मुळी ग्रामपंचायत कचेरीत. पुढाऱ्याने पोलिसांना ग्रामपंचायत कचेरीत वहिमी बायांना मारपीट करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली ही वस्तुस्थिती असल्याचेही गावकरी म्हणत आहेत. पोलिसांनी वहिमीकडून गुन्हा कबूल करून घेणेसाठी अगबळाचा उपयोग करून घेऊ नये, असा दंडक आहे. पण प्रत्यक्षात पोलीस गोरगरिबांना मनसोक्त मारझोड करताना नेहमीच आढळतात. एखाद्या वजनदार पुढाऱ्याच्या वा सावकाराच्या ८।१२ आण्याच्या वस्तूची एखाद्या वारल्याकडून

नासधूस झाली वा ती चोरली गेली तर त्याबद्दल पोलीस त्या पुढाऱ्याला खूष करण्यासाठी, त्याची लहर सांभाळण्यासाठी वहिमी वारल्याला एक दुसरी कानशिलातच मारतात असे नव्हे– जेवढ्या सहजतेने आपण ढेकूण चिरडून टाकतो तेवढ्या सहजतेने ते कदाचित वारल्यांना ठारही मारतात असे काही प्रकारांकडे पाहिल्यावर आढळून येते. ३।३।। वर्षांपूर्वी वसई पोलीस स्टेशनपासून दोन मैलांवरील एका खादीधारी पुढाऱ्याच्या बाबतीत घडलेला हा प्रकार आहे. त्या पुढाऱ्याच्या म्हणण्याप्रमाणे एका वारल्याने रात्री ९।१० च्या सुमारास त्या पुढाऱ्याच्या नारळीच्या झाड वचे नारळ व माडी चोरली. म्हणून त्या पुढाऱ्याने त्या वारल्यास यथोचित मारपीट केली आणि वसई पोलीस स्टेशनवर रात्री आणले. पोलिसांनी पुढाऱ्याची आज्ञा मानून लाथाबुक्क्यांचा प्रसाद देत देत त्या वारल्यास लॉकअपमध्ये टाकले. दुसरा दिवस उगवला. लॉकअपमधील कैदी प्रातर्विधीसाठी सज्ज झाले पण हा वारली काही उठेना. बराच वेळ गेला. फौजदार शेळके वारल्याच्या जवळ जाऊन पाहू लागले. कधीच प्राण निघून गेलेल्या निर्जीव प्रेतावरील सुक्या रक्तावर मुंग्या तुटून पडलेल्या आढळून आल्या. ठाण्याला तेव्हा पोलीस प्रमुख म्हणून सुधाकर भावे तर जिल्हा कलेक्टर म्हणून द्वारकानाथ कपूर होते. पण त्यावेळी प्रमोद नवलकर किंवा मृणालताई गोरे असे आमदार नव्हते आणि धनगरांचा संबंध या पिढीजात पुढाऱ्याच्या तालुक्याला लागला नव्हता. त्यामुळे थातूरमातूर करून बिचाऱ्या वारल्याच्या मृत देहाला मूठमाती देऊन सारे काही ठाकठीक करण्यात आले.

सांगण्याचे कारण एवढेच की ४।६ आण्याच्या स्वार्थासाठी वारल्याचा खून करणे हे शेट, सावकार, पुढारी या त्रयींना या जिल्ह्यात 'गुन्हा' असे वाटत नाही आणि खरोखरच 'गुन्हा' या सदरात पोलीस त्याची दखलही घेत नसतात.

रऊबाईला मारपीट झाल्यावर पोलिसांनी तिची भावजय जया शनवार वळवी हिला खोलीत घेतले. जया तीन महिन्याची पोटाशी म्हणजे गरोदर आहे. पोलिसांचा मार असह्य होत असताना जवळ उभ्या असलेल्या एका शेटजींना कळवळून जया म्हणते, 'तुम्ही सांगा त्यांना आता मला मारू नका म्हणून !' तात्काळ शेटजी उत्तरले, 'पोलीस चौकशीचे कामात मला बोलता येत नाही.' किसान सभेच्या एल. बी. धनगरांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रातील ही अवतरणे मी जशीच्या तशी वर देत आहे. त्यानंतर तब्बल एक आठवड्याने तिथे गेलेल्या आमदार मृणाल गोरे यांनाही वरील अवतरणातील मजकूर ऐकावयास मिळाला. मी बाहेर केलेल्या चौकशीतही अवतरणातील घटना घडल्याचे कळले.

धनगरांचे म्हणणे आहे सदर बायांकडून त्यांना सापडलेले बेवारशी पैसे उपटावयाचे आणि ते वाटून घ्यावयाचे यासाठी ही मारपीट चालली होती.

धनगरांनी तसे मुख्यमंत्र्यांना कळविले आहे.

या सर्व प्रकरणाच्या चौकशीतून एक सत्य निघते ते हे, की रऊबाईला कुणाचे तरी ४–५ शे रुपये सापडले होते. त्यातील काही रक्कम त्या कुटुंबाने खर्चिली होती व २०० रुपये मारपिटीनंतर त्या कुटुंबाने पोलिसांना दिले. धनगर आणि वळवी कुटुंबाच्या म्हणण्याप्रमाणे शेठ-पुढारी-पोलीस या त्रिकुटीचा अंदाज रऊबाईला यापेक्षाही जास्त रक्कम सापडलेली होती व ती २–३ हजाराच्या जवळपास होती व ती सर्व हस्तगत करण्याचा त्या त्रिकुटाचा प्रयत्न चालला होता.

शहरी वाचकांना अतिशयोक्ती वाटेल पण एक संभाषण असे–

'मला मारू नका. मी पोटाशी आहे (गरोदर)' जया.

'हं, पोटाशी आहेस तर पोट कुठे तुझे मोठे दिसत नाही ते? खरे बोल.' पोलीस.

त्याचबरोबर मी सुरुवातीलाच रऊबाईचे जे आर्त स्वर अवतरणातून दिले आहेत ते दुसऱ्या बाजूकडील लोकांनी मिठमसाला घालून रंगविलेले तर नसतील ना, अशी कुणाला शंका वाटेल. पण ९ तारखेनंतर ८–१० दिवसांनी त्या जागेवर आमदार मृणाल गोरे आणि बाबूराव सामंत गेले होते. त्यांनी अगदी मोकळ्या वातावरणात जयाला विचारले, तेव्हाही तिने तेच शब्द सांगितलेत आणि त्यापूर्वी एक आठवडा एल. बी. धनगरांजवळ पण जया तेच शब्द बोलली. कुठचीही आदिवासी स्त्री बनावट जबाब जश्याचा तसा १ तासाच्या फरकाने सुद्धा देणे शक्य नाही आणि येथे तर तब्बल ८ दिवसांचा फरक आहे. उलट ज्या घटना घडलेल्या असतात त्या मनावर पूर्णपणे बिंबलेल्या असतात. अंतकरणावर कोरल्या जातात आणि म्हणून अशा घटना ८ दिवसांनीच काय पण प्रसंगी ८ वर्षांनीही माणूस जश्याच्या तश्या सांगू शकतो.

जयाच्या ८ दिवसाच्या अंतराने दिलेल्या दोन जबाबांची तंतोतंत बरोबरी हेच सांगते, की पोलिसांनी रऊला विवस्त्र केले होते. छातीवर हात टाकला होता. आणि तिची विटंबना केली होती. □

रऊ ही १९–२० वर्षाची विवाहित तरुणी होती व तिच्या लग्नाला ४–४॥ वर्षे लोटली पण ती नवऱ्याकडे राहात नसे. ती रामा वळवी या आपल्या बापाकडेच स्वतंत्र होती. रऊ रंगेल होती. रऊला सिनेमाचा नादही और होता. पानाचा विडा तोंडात ठेवण्याचा तिला फार शोक असे. सामान्य वारली स्त्रीसारखी साडी नेसणे तिला आवडत नसे. उभ्या सोग्याचे लुगडे ती नेसत असे. लग्नानंतर रऊ नवऱ्याकडे राहिलीच नाही. आणि तिचे तारुण्य तर ऐन बहरात आले होते. या पार्श्वभूमीवर सुरुवातीच्या अंकात एका प्रवेशात सांगितल्याप्रमाणे हवालदार नाचणे आणि ठाकूर, ग्रामपंचायतीच्या खोलीत रऊ एकटी आणि विवस्त्र असताना

पागल झाले असणे संभवनीय वाटते. पंचायतीशी संबंधित अशा १-२ पदाधिकाऱ्यांचाही डोळा रऊच्या तारुण्यावर खिळला होता अशी माहिती हाताला लागली. मात्र अनेक ठिकाणी विचारपूस करूनही, ज्या चुरीच्या घरी रऊ व तिचे वडील काम करतात ते कुटुंब मात्र या लफड्यात कुठेही स्पर्श झालेले दिसत नाही.

ज्या एवढ्या मोठ्या कांडाला निमित्त 'रऊला सापडलेले पैसे' झाले, ती काय भानगड आहे ?

पोलिसांकडे पाच हजार रुपयांचे पाकिट हरवल्याची एका श्रीमान शेटजीची तक्रारनोंद आहे. हे पाकीट हरवल्यानंतर रऊ वारंवार सिनेमाला जावू लागली. दारू जास्त पिवू लागली. पानाच्या विड्यांची विक्री वाढली. सुक्या बोंबलांची जागा ताज्या ताज्या दाढा घोळ या माशांनी घेतली. त्यामुळे हे पैसे रऊलाच 'सापडले' असा सर्वत्र गवगवा झाला. पण बारकाईने कानोसा घेतल्यावर एक नवीन संशय निर्माण होऊ लागतो.

संबंधीत श्रीमान शेटजींचे पाकीट अनवधानाने हरवले की रऊच्या मोहजालात दिल चोरीला गेले तिथे हरवले ? या हरवण्यामधील फरक लक्षात घेवून 'हरवण्याचा' निश्चित प्रकार कोणता हे ठरवल्याशिवाय सि. आय. डीं. ना देखील सत्य शोधून काढता येणार नाही.

वाणगाव ते चिंचणी (मधी देदाळे गाव येतो) या दरम्यानच्या कित्येक लोकांच्या बोलण्यात रऊने पाकिटवाल्या शेटजीला बनविले होते असा सूर निघत होता. थोडीशी पूर्वपीठिका माहित असणाऱ्या या लोकांचे म्हणणे असे— सदर शेटजी आपण बनलो म्हणून बिथरला आणि त्याने आणखी काही पैसे गेले तरी चालेल पण रऊला ठिकाणावर आणावी या हेतूने पुढारी-पोलीस वगैरेंना हाताशी धरून पुढील सूड उगविला असावा. मात्र या सूडाचे पर्यवसान रऊच्या मृत्यूत व्हावे या थरापर्यंत यापैकी कुणीच नव्हता.

सेक्सने बिथरलेला शेटजी आणि पुढारी आपले लक्ष्य ठरलेल्या स्त्रीवर सूड घेण्यासाठी पोलिसांचा उपयोग करून घेतात असे यापूर्वीही अनेकदा आढळून आलेले आहे. ताजेच उदाहरण द्यावयाचे तर ४-५ वर्षापूर्वी मुंबईचे प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट श्री. कार्डिलो यांच्या न्यायालयातील सिनेनटी नाडकर्णी प्रकरणाचे देता येईल. सुप्रसिद्ध कायदे पंडित श्री. दत्तोबा कोदे यांनी आरोपी तर्फे केसचे शवविच्छेदन करताना काही महत्वाच्या बाबी कार्डिलो साहेबांच्या नजरेस आणल्या होत्या. त्यातील काही मुद्दाम मी येथे देतो.

सिनेनटी नाडकर्णी हिचेवर श्री. बाबासाहेब मोरे यांचे लक्ष होते. पण नाडकर्णीबाई काही त्यांना वश होत नव्हत्या. म्हणून व्हिजीलन्स ब्रँचचे P. S. I. मेहता यांना हाताशी धरून मेहतांकरवी नाडकर्णीबाईवर 'धंदा' करण्याचा खोटा खटला दाखल केला गेला.

पुढे न्या. कार्डिलो यांनी नाडकर्णी-बाईंना निर्दोष सोडलेच पण P. S. I. मेहतांच्या 'अफाट' कार्याबद्दल तीव्र ताशेरे झाडले. आत्ताचे अॅ. आय्. जी पी. श्री. इ. एस्. मोडक तेव्हा मुंबईचे पो. कमिशनर होते. त्यांनी तात्काळ मेहतांना नोकरीवरून उडवून लावले. यातील मुख्य मेख ही की P. S. I. मेहतांना नाडकर्णीबाईवर खटला दाखल करताना कोर्टाच्या कागदावर कुठेही आणले नाही. पण आरोपीच्या वकिलाने आणले आणि बरोबर याही प्रकरणात पाच हजार रुपये हरवून बसलेला शेठ अजून कुठेही मेकअप करून स्टेजवर आलेला नाही.

रऊ पोलिसांच्या माराने मेली नाही. विषप्राशनाने मेली असा दावा पोलिसांचा आहे. पण पोलीस गावात आले तेव्हा रऊ जिवंत होती. जवळपास डॉक्टरपर्यंत जिवंत होती. अशा स्थितीत डॉक्टर अथवा पोलिसांनी किंवा दोघांनीही रऊचा मृत्युपूर्व जबाब नोंदवून का घेतला नाही. येथे संशयाला फार मोठी फट राहते १० तारखेला रऊ डॉक्टर-कडे गेली व ११ तारखेला डॉक्टरकडे रऊ मेली.

कदाचित विधानसभेत ना. शरद पवार म्हणाले, 'अधिकाऱ्यांचा भरवसा देऊन मी सांगत आहे', त्यामागची हीच गोम असावी. विषप्राशनाचा जरी प्रकार असला तरी राज्य गृहमंत्री म्हणतात, पोलिसांच्या माराने घाबरून तिने विष-प्राशन केले असावे. म्हणजे पोलीस रस्ता सोडून फार दूर गेलेत हे खुद्द गृहमंत्रीदेखील मान्य करावयास झाले. म्हणजेच तिच्या मृत्यूस पोलीस कारणी-भूत झाले, असा त्याचा अर्थ होत नाही का?

वसईतील बाळू बरफ, महाद्या बरफ आणि वामन जाधव यांच्या तथाकथित 'फासाला' त्यांना कर्जापायी चिरडून टाकणारा सावकार कारणीभूत ठरत नाही का? समान अर्थाच्या ह्या केसेस आहेत.

'रऊबाईने दुसऱ्या दिवशी, ता. १०-२-७३ ला सकाळी ताडी घेतली, त्यातून विष घेतले. त्यामुळे तिला उलट्या होऊ लागल्यामुळे सरपंच चुरींनी पोलिसांना बोलावून घेतले व पोलीस आले.' —उलट बाजूचे हे म्हणणे आहे. तर रऊला व जयाला आदल्या दिवशी यथेच्छ मारपीट केल्यावर, त्यांची विटंबना केल्यावर पोलीस म्हणाले—'आम्ही उद्या सकाळी येऊन तुम्हाला ठाण्याला नेणार आहोत व तिथे तुम्हाला नागडे करून तुमच्या वगैरे वगैरे...तेव्हा उद्या सकाळी येथे (पंचायत कचेरीत) या.' रऊची भाव-जय जया आपल्या स्वखुशीच्या लेखी जबाबात आमदार मृणाल गोरेंना वरील-प्रमाणे म्हणाली आहे.

उलट बाजूने दुसरा एक युक्तिवाद करण्यात येत आहे तो असा—'रऊजवळ त्या 'हरवलेल्या' पाकिटातील आणखी रक्कम असावी व ती आपणास मिळावी म्हणून रऊच्या माहेरच्याच माणसांनी रऊला विष दिले असावे'

पण हा युक्तिवाद तर्काच्या निकषा-

वर टिकत नाही. कारण रऊची ठेवण, वागणूक, उधळेपणा, व्यसने हेच सांगतात, कीं रऊ पैसा 'पुरून' ठेवणारी कंजूश स्त्री नव्हती तर पुरी दिलदार आणि रंगेल होती. शिवाय रऊची भावजय जया आमदार मृणाल गोरेंकडे जबाब देताना जरादेखील बिचकत नव्हती. त्या जबाबात ती खुल्या मनाने म्हणते, पोलिसांच्या मारपीटीनेच रऊ मेली आहे.

याच्यातले महत्त्वाचे तीन टप्पे असे–

९ तारखेला सायंकाळी रऊला फार मारले. तिची विटंबना केली.

१० तारखेला रऊला चिचणी मेडिकल सेंटरला नेली.

११ तारखेला रऊ मेली.

सतत ३ दिवस चाललेल्या या प्रकरणात पोलिसांनो, डॉक्टरनी रऊची मृत्युपूर्व जबानी नोंदवून घेणे जरूरी होते व ती कुठेही दिसत नाही.

चिचणी पोलिसांकडे पैसे हरविलेल्या शेटजींची तक्रार पाच हजाराची होती. पण जयाला मारपीट करताना जयाला पोलीस म्हणाले तुम्हाला (रऊला व जयाला) दोन हजार रुपये सापडले आहेत. म्हणजे मूळ तक्रारदाराची पाच हजार रुपयाची बोंब खरी असावी व त्या 'हरवलेल्या' पैशामागे रऊ व शेटजी याचा 'सेक्स' मामला असावा असा दाट संशय ठेवण्यास पुरेशी जागा आहे.

३०० रुपये खर्च झाल्याचे रऊ जयांनी पोलिसांना सांगितल्यावर २०० रुपये जयाचा नवरा शनिवार याने पोलिसांना ९ तारखेलाच दिले आहेत. जर रक्कम जास्त असती तर तीही त्याच वेळी दिली गेली असती.

एल. बी. धनगरांच्या मुख्यमंत्र्यांकडील तक्रारीत फार मोठा आक्षेप असा आहे, की वाणगावचे P. S. I. नी जयावर दडपण आणून 'रऊ विष प्याली असे सांग' असे सांगावयास सांगितले पण जया तसा खोटा जबाब देईना म्हणून तिला मारले जया P. S. I ला म्हणायची 'रऊला पोलिसांनी (ठाकूर नाचणे) बुटांनी, काठीने मारले त्यामुळे तो मेली! पण प्रत्यक्षात P, S. I ने जयाचा म्हणून जो जबाब नोंदविला तो जयाच्या म्हणण्याप्रमाणे नोंदविला नाही. धनगरांचा हा आक्षेप विचारात घेण्यासारखा आहे.

धनगरांचा मुख्यमंत्र्यांकडे आणखी एक महत्त्वाचा आक्षेप असा–'१०–२–७३ ला रऊला बैलगाडीतून चिचणीला नेले तेव्हा बैलगाडीत तिला झोपविले, त्या पेंडा गवतावर रक्ताचे डाग होते.' हे संबंध प्रकरण उजेडात आणण्याचा फार मोठा त्रास मर्क्सिस्ट नेते धनगर यांनी घेतला आहे. गृहमंत्र्याकडे त्यांनी जे सहा मुद्दे उपस्थित केले आहेत ते येथे जसेच्या तसे देणे योग्य होईल.

## धनगरांचे सहा मुद्दे

१. रऊचा मृत्यु विषप्राशनाने न होता पोलीस मारहाणीमुळे झाला आहे. त्याची न्यायालयीन चौकशी व्हावी.

२. ठाकूर व नाचणे या दोन पोलिसांविरुद्ध विनयभंग व खुनाच्या आरोपाखाली कारवाई व्हावी.

३. या दोन पोलिसांना फूस देणारे

व अप्रत्यक्ष मदत करणारे असतील त्यांचे धागेदोरे शोधून त्यांचेवर कारवाई व्हावी.

४. वाणगावचे P. S. I व चिचणीचे मेडिकल ऑफिसर यांनी गुन्हा लपविण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांचेवर कारवाई व्हावी.

५. पुरावा नष्ट करणेची भिती आहे म्हणून संबंधित कागदपत्र ताब्यात घ्यावेत व चौकशी होईपर्यंत कलम २, ३, ४ मधील लोकांना रिमांडमधे, अटकेत ठेवावे.

६. मयत रऊच्या बापाला मदत म्हणून सरकारने ५००० रुपये द्यावेत.

धनगरांच्या या मागण्या किसान सभेचे सेक्रेटरी व मर्क्सिस्ट कम्युनिस्ट पक्षातर्फे आहेत.

धनगरांबरोबरच विधानसभेत या प्रकरणाला वाचा फोडण्याचा पहिला मान शिवसेना आमदार श्री. प्रमोद नवलकर आणि आमदार मृणाल गोरे यांना मिळाला आहे. आमदार मृणाल गोरे आणि मुंबई समाजवादी पक्षाचे नेते बाबुराव सामंत देदाळे गावी जाऊन प्रत्यक्ष चौकशी करून आले. तेव्हा हा खूनच आहे अशी त्यांची खात्री झाल्याचे ते मला म्हणाले.

एक गोष्ट या ठिकाणी मुद्दाम उल्लेख करावीशी वाटते ती ही की, असे वा यापेक्षा जास्त भीषण अत्याचार पोलिसांकडून यापूर्वी कधी घडलेच नाहीत असे म्हणता येत नाही. पण यावेळी सभापती वानखेडे आणि राज्यगृहमंत्री पवार यांनी देखील विरोधी आमदारांच्या आक्षेपाची थोडीफार दखल घेतली. सहसा सरकार पक्षाकडून एवढी दखल सभागृहात घेतल्याचे उदाहरण नाही. खुद्द सभापती वानखेडे यांनी या दुर्दैवी प्रकाराबद्दल कमालीची दक्षता घेतल्यामुळेच सरकार पक्षाला प्रतिष्ठेच्या खोट्या भपक्याखाली जाणे कठीण झाले असावे.

आता सि. आय् डी. मार्फत या प्रकरणाची चौकशी होईलच. सी. आय्. डी. चौकशी बद्दल तुम्हाला काय म्हणावयाचे आहे ? निरनिराळ्या प्रतिक्रीया पुढील प्रमाणे —

१ : समाजवादी – निश्चित सांगणे कठीण आहे. सत्य बाहेर येण्यासाठी यापेक्षा सरस मार्ग पाहिजे.

२ : मार्क्सिस्ट : न्यायालयीन चौकशी पाहिजे.

३ : सामान्य लोक — चार दिवस पेपरवाले बोंबा मारतील, मागाहून लोक विसरून जातील. काही होणार नाही.

४ : काही सरकारी अधिकारी : सरकारी माणसांचे मधल्यामधी मरण. त्यांनी कसे वागावे तेच कळत नाही. पुढाऱ्यांच्या लहरी संभाळल्या नाहीत तरी मरण, संभाळल्या तरी मरण. आमचे जीवन तारेवरची कसरत आहे.

अखेरच्या प्रवेशात मला भाऊसाहेब वर्तकांना आणल्याशिवाय दि एन्ड करता येणार नाही.

विधानसभेत पालकमंत्री म्हणून भाऊसाहेब वर्तकांचा उल्लेख करताच सभापतींनी आमदार नवलकरांना चापले होते. सभापतींच्या मते त्यात वर्तकांचा

काही संबंध नव्हता व सभागृहापुरते ते बरोबरही असेल.

पण भाऊसाहेब या जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत. पालकाने पाल्यांकडे पाहताना हा डावा हा उजवा, हा माझा हा दुसऱ्याचा असा पंक्तीप्रपंच करणे योग्य नव्हे. निदान वर्तकसाहेबांकडून तरी तशी अपेक्षा नव्हती. म्हणून येथे एक आठवण नमूद करतो.

३–३॥ वर्षांपूर्वी डहाणू भागातील एका मारवाडी व्यापाऱ्याच्या कानशिलांत १।२ वारल्यांनी मारले होते. बस!! डहाणू भागातील स्मगलर्स, काळाबाजारवाले आणि सावकारांनी एकच बोंबाबोंब उठविली–डहाणूला नक्षलवाद सुरु झाला. !' आमचे पालकमंत्री सर्व कामे बाजूला ठेवून डि. एस्. पी. सह दीड-दोनशे पोलीसांसह त्या भागात तळ ठोकून ४।६ दिवस राहिले व शेवटी जिल्हाकलेक्टर द्वारकानाथ कपूर (आत्ता कोल्हापूर कॉर्पोरेशनचे कमिशनर) यांनी डिटेल चौकशी केली. तेव्हा आढळून आले, की एका मारवाड्याने हिशोबात बदमाशी केली म्हणून संतापलेल्या १।२ वारल्यांनी त्या व्यापाऱ्याच्या कानशिलात ठेवून दिली, बाकी काही नाही.

प्रश्न असा पडतो, की एका बदमाश व्यापाऱ्याच्या कानशिलात बसल्याबरोबर अर्ध्या ताटावरून पळत सुटणारे वर्तक देदाळे गावो महाभारत घडत असताना गप्प का ?

विधानसभेबाहेर आमदार मृणाल गोरे आणि प्रमोद नवलकर यांनी वर्तकांना टाकलेला हा प्रश्न वर्तकांनी अनुत्तरीत ठेवणे खुद्द वसंतराव नाईकांनाही पेचात आणणारे आहे. सरंजामी वृत्तीच्या आणि शेटगिरी करणाऱ्या लोकांच्या क्षुल्लक हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी या जिल्ह्यात राजकर्त्यांकडून पोलिसांना वापरले जाते असे यापूर्वीचे कडवट अनुभव आहेत. एकदा खोटया कामासाठी पोलीस वापरावयाचे ठरविले, की पोलीस मागाहून कसेही रानटीपणाने वागतात. काही दिवसापूर्वी विरार भागात तीन फौजदार 'रंगात' आले असताना त्यांनी कदम नावाच्या पोलिसालाच पिटून काढले. बिचारा कदम हवालदार अंगावरील मार दाखवायला सरळ ठाणे डी. एस पी. श्री. परांजपे साहेबांसमोर उभा राहिला. या जिल्ह्यात पोलिसांचे नैतिक अवमूल्यन किती झाले आहे याचे हे दाखले हेच दर्शवितात, की पोलीस कायदा आणि सुव्यवस्था राखण्याऐवजी तिच्यावरच प्रहार करीत आहेत.

● ● ●

# आ ले पा क

■ महाराष्ट्रात मार्च १९७२ मध्ये नवीन मंत्रीमंडळ स्थापन झाल्यावर बंगल्यांसाठी घेतलेले फर्निचर, तसेच बंगल्यांची दुरुस्ती व नवीनीकरण या बाबींवर डिसेंबरअखेर २ लाख १५ हजार ६८९ रुपये खर्च झाला.

मुख्यमंत्र्यांच्या टंचाई निवारण निधीतून हा खर्च भागवला गेला काय ?

■ काँग्रेसच्या एक आमदार सौ. आशा ताले विधानसभेत म्हणल्या : महागाई-मुळे संसार करणे अशक्य झाले आहे.

अरेच्चा ! महागाई न जाणवण्याचा एकमेव उपाय म्हणून आम्ही मिळवत्या मुलीशी संसार थाटण्याच्या विचारात होतो.

■ पुरवठामंत्री भाऊसाहेब वर्तक विधानसभेत पुन्हा पुन्हा सांगतात : भाववाढ रोखण्यासाठी जे शक्य ते सारे शासन करत आहे.

भाववाढसुद्धा बेटी अशी चावट, रोखली जाऊ नये म्हणून शक्य ते सारे करतेच आहे.

■ शिक्षणमंत्री प्रा. अनंत नामजोशी एके ठिकाणी म्हणाले : शिक्षकांना हे शासन नेहमीच सहानुभूतीपूर्वक वागवीत आले आहे व यापुढेही वागवतील.

ही डौलाने सांगायची गोष्ट नव्हे अनंतराव; शिक्षकांना सहानुभूतीची गरज भासावी ही लाजिरवाणी गोष्ट आहे.

■ मुंबई महापालिकेसाठी उभ्या असलेल्या एका उमेदवाराने म्हटले होते : मला निवडून येण्याची खात्री होती; पण डॉक्टरच्या सल्ल्यानुसार मी माघार घेतली आहे.

हा डॉक्टर मोठा खात्रीचा असणार.

■ मिलोतील धत्तुऱ्याबद्दल 'नवशक्ती' दैनिक म्हणते : तांदूळ, गहू, ज्वारी व मिलो या रेशनवरील सर्वच पदार्थात दगड, कचरा आदी वस्तू सापडतात, आणि ग्राहक त्या काळजीपूर्वक बाजूला काढतात. ग्राहकांना ही चांगली सवय असल्याने धोत्र्याच्या बियांवरून गडबडून जाण्याचे कारण नाही

ग्राहक 'नवशक्ती'चा नियमित वाचक असेल तर प्रश्नच येत नाही. 'नवशक्ती'तील छपाईच्या चुका बाजूला काढण्याचा अनुभव धोत्र्याच्या बियांच्या बाबतीत त्याला चांगला उपयोगी पडेल.

■ मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत जनसंघाने मतदारांना पुढीलप्रमाणे आवाहन केले होते : सुंदर, स्वच्छ आणि सुसह्य मुंबईसाठी जनसंघाला

मते द्या.

गोष्ट साधी, सरळ, सोपी.

■ दामुअण्णा मालवणकर ऐंशी वर्षांचे झाले. या वाढदिवशी ते म्हणाले: निर्व्यसनीपणा हे माझ्या दीर्घायुष्याचे रहस्य आहे.

निर्व्यसनीपणाकडे काणाडोळा करून दीर्घायुषी होणे शक्यच नाही काय?

■ विधानसभेत मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी पुढील माहिती पुरवली: १९७१ साली मुंबईतील मोटारगाड्यांची संख्या ९८ हजार १४८ होती. ती १९७२ साली १ लाख ४ हजार ७०५ झाली. मोटारबसेसची ३८०१ वरून ३८९९, लॉरीजची संख्या २० हजार ७१४ वरून २१ हजार ९९ व टेम्पोची संख्या ६२२५ वरून ६८४७ इतकी झाली.

एकूण मुंबईत मोटारडे लोक वाढताहेत.

■ अनेक मराठी नाट्यरसिकांचे मराठी रंगभूमीवरील नटमंडळींबद्दलचे एक मत (किंवा एकमत): 'एक लागू, बाकी सगळे गैरलागू' □

## वा. ल. कुळकर्ण्यांविषयी थोडेसे

पदवीपरीक्षेसाठी मराठी विषय घेणारा विद्यार्थी मराठीचा प्राध्यापक व्हायचे स्वप्न पाहतो. मात्र त्याचे आडनाव 'कुळकर्णी' असेल तर त्याला तसे स्वप्न वगैरे पाहावे लागत नाही; तो रीतसर प्राध्यापक होतोच; आणि पुढे एका जबाबदार कर्तव्यदक्षतेने टिकाळ ('टीका' या शब्दापासून साधलेले आणखी एक विशेषण) लेखन करत राहतो. कृ. पां. कुळकर्णी, द. भि. कुळकर्णी, कृ. भि. कुळकर्णी, गो. म. कुळकर्णी, वि. म. कुळकर्णी, व. दि. कुळकर्णी, श्री. रं. कुळकर्णी, भीमराव कुलकर्णी ही सहज आठवलेली नावे आणि त्यांचे कर्तृत्व पाहा म्हणजे माझे म्हणणे तुम्हाला जरूर पटेल. माझी अशी खात्री झाली आहे की, लहानपणी अंगाईगीतांऐवजी 'अंगाईगीतातील नादगुणाचे स्थान' या विषयावरची मौलिक (आणि "माऊलि'क) चर्चाच समस्त कुळकर्णी कुलदीपकांच्या कानावर पडत असावी. असो.

वर दिलेल्या नामावळीत एका कुळकर्ण्यांचे नाव आम्ही मुद्दामच घेतलेले नाही. प्रिय वाचकांच्याही ते लगेच आले असेल ते नाव प्राध्यापक वा. ल. कुलकर्णी यांचे. त्याचे साधे, सोपे, सरळ कारण असे आहे की आम्ही 'प्रा. वा. ल. कुळकर्णी यांच्याचविषयी थोडेसे' लिहायला बसलो आहोत.

मराठवाडा विद्यापीठाच्या सेवेतून वा. ल. नुकतेच निवृत्त झाले. त्यापूर्वी मुंबईला विल्सन महाविद्यालयात ते कितीतरी वर्षे मराठी विषय शिकवत होते. या काळात वा. ल. आणि विल्सनच्या मराठीच्या विद्यार्थ्यांचे नाते असे जिव्हाळ्याचे होते की त्या

विल्सोनियन्सना मी वाल्सोनियन्स म्हणायचो !

असे नाते निर्माण होणे ही आपण समजतो तेवढी सोपी गोष्ट नाही. वा. लं.च्या बाबतीत ती गोष्ट सोपी झाली याचे कारण वा. ल. आपल्या शिकवण्यात निरपेक्षपणे रमतात. त्यासाठी अखंड वाचत राहतात. टीपा टिप्पणी साक्षेपाने तयार करतात त्यांची पुन्हा पुन: नव्याने संपादणी करतात. मराठीचे प्राध्यापक असूनही वा. लं.कडे निगरगट्ट बनचुकेगिरी एकूण कमीच.

१९४५ नंतर मराठी साहित्याचे स्वरूप हळूहळू बदलू लागले. त्यापुढील दहापंधरा वर्षात हा स्वरूपबदल ठसठशीतपणे जाणवू लागला. नव्या साहित्याला नव्या समीक्षेची गरज होती. ही गरज वा. ल. कुळकर्ण्यांच्या तळमळीच्या समीक्षेने बऱ्याच प्रमाणात भागवली. वा. लं.च्या समीक्षेचे हे ऐतिहासिक (आणि त्यापलीकडचेही) महत्त्व आपण अवश्य लक्षात घेतले पाहिजे.

ते लक्षात घेतले म्हणजे वा. ल. कुळकर्ण्यांच्या समीक्षेच्या मर्यादा सांगायला आपण मोकळे होतो. (कोणाच्याही मर्यादा सांगताना माझा लिहिता बाहू कसा स्फुरण पावतो.) छोटया गोष्टी मोठ्या करून सांगणे आणि सोप्या गोष्टी अवघड करून सांगणे ही कला मराठीच्या प्राध्यापकांनी पूर्णत्वाला नेली आहे. वा. ल. कुलकर्ण्यांच्याही लिहिण्यात आणि शिकवण्यात असा प्रकार घडतो. तथापी, मला असे नेहमी वाटत आलेले आहे की वा. लंनी केलेल्या अनेक मार्मिक निरीक्षणांची उचित दखल मराठी चिकित्सक रसिकतेने घेतलेली नाही.

वा. ल. कुळकर्ण्यांच्या समीक्षेचे (आणि शिकवण्याचेही) आणखी एक वैशिष्टय मला जाणवते. ते असे की ती काहीशी वाचाळ, शब्दबंबाळ आहे. आपल्या तरल प्रतिक्रिया नेमक्या मांडण्याच्या वा. लं.च्या प्रामाणिक प्रयत्नातूनच हे वैशिष्टय निर्माण व्हावे, ही दुर्दैवाची गोष्ट होय.

वा. ल. कुळकर्ण्यांनी आत्तापर्यंत विपुल समीक्षालेखन केले असेल तरी त्यातील बहुतेक सारे लेखन स्फुट स्वरूपाचे आहे. स्वत:लाच आव्हान देईल असा टीकाग्रंथ त्यांनी अजून लिहिलेला नाही. (त्यामुळे कधी कधी गंमतीने वा. लं.ना मी 'टीकाकार' न म्हणता 'टीपाकार' म्हणतो.)

या मर्यादा नोंदतानाही वा. लंच्या साहित्याविषयीच्या निर्भर उत्साहाची याद पुन्हा पुन्हा येत होती. वा. लंच्या निर्भर उत्साहापासून मराठी समीक्षेला पुष्कळ काही शिकता येईल; पण त्यांच्या मर्यादांचेच बेडौल अनुकरण करण्याचा हेकटपणा ती करणार असेल तर तुम्ही आम्ही कोठे जावे ?

वा. लंची निवृत्तीनंतरची वर्षे धाईगर्दीची, गजबजलेली कार्यठरकाची जावोत अशी सदिच्छा आम्ही मोठ्या प्रेमादरपूर्वक व्यक्त करतो.

—अनंतराव

लीला श्रीवास्तव

# अतिरेकी फॅशनला जबाबदार कोण ?

फॅशन ! भाषेतला सर्वाधिक उपयोगात येणारा शब्द. आधुनिक युगाचं प्रतिनिधित्व करणारा, व्यक्तिच्या आधुनिकतेचं सार्थक मोजमाप करणारा एक शब्द !

फॅशनचे मुख्य अड्डे आहेत, देशातली महाविद्यालयं, फॅशनच्या सृजनाचे दोन मुख्य स्रोत्र] आहेत, सिनेमा व पश्चिमद्वारा आयात. या दोन्ही स्त्रोताद्वारा प्रयुक्त केलेली कोणतीही नवी फॅशन आंधळेपणे चटकन उचलली जाते. मोठाल्या टेलरिंग फर्ममध्ये विदेशी फॅशन डिझाइनरद्वारा काढली जाणारी मासिके दरमहा आयात होत असतात. जोडीला धनिकांचे मुलंमुली स्वत: आयात केलेल्या मासिकांतून नित्य नवी डिझाइन्स देऊन जातात. मग फॅशन अशी वरच्या थरातून निथळत खालच्या थरापर्यंत पोचते खरं म्हणजे ती तशी पोचते न पोचते. तोवर दुसरी आणखी नवी फॅशन सुरू झालेली असते.

फॅशनची चंचलता पाहून तोंडात बोटं घालाविशी वाटतात. कालपरवापर्यंत ब्लाऊझच्या बाह्या दंडाच्या वर गळ्याच्या हाडापर्यंत पोचल्या होत्या. आणि आज त्या चक्क मनगटापर्यंत खाली आलेल्या आहेत. पुरुष आता ब्लाऊझवजा बुशशर्टच काय पण गळ्यात चक्क माळा घालू लागले आहेत. इंजिनियरिंग कॉलेजात शिकणाऱ्या माझ्या मुलानं मला सांगितलं की त्याच्या कॉलेजातली अर्धीअधिक मुलं गळ्यात मण्यांच्या माळा घालून येतात. (मला खात्री आहे, यापुढं पुरुषात बांगड्या घालण्याची फॅशन निघेल !) केसाच्या फॅशनचे प्रकार तर काही विचारूच नका. मुली बॉयकट आखूड केस ठेवतात आणि मुलं मुलीसारखे मानेपर्यंत केस वाढवतात. मुली लुंगी नेसू लागल्या आहेत. (मुलं साड्या कधी नेसणार ? फॅशनची चंचलता पाहून हे मुळीच असंभव वाटत नाही.)

फॅशनचा संबंध असलाच तर तो कल्पकतेशी आहे, बुद्धिमत्ता वा औचित्याशी दिसत नाही. उपयुक्ततेशी तर नाहीच नाही. एका गोष्टीचे श्रेय मात्र फॅशनला द्यायलाच हवे. आजच्या फॅशन्स खर्चिक नाहीत. न्हाव्याच्या खर्चापासून तो सोनाराच्या खर्चापर्यंत



सगळी बचत. एक दोन-चार रुपयांची दगडी मण्यांची माळ गळय़ात अडकवली की झालो आम्ही फॅशनेबल. चांदी, सोन्यामोत्याची आवश्यकता नाही. कपडाही महागडा, तलम पोताचा हवा असा आग्रह नाही. फक्त नव्या डिझाईनचा व नव्याआकाराचा शिवलेला असला म्हणजे झालं.

फॅशनचा संबंध जोपर्यंत स्मार्टपणा वा आधुनिकपणाशी आहे तोपर्यंत सारं ठीक आहे. अशी फॅशन डोळयांना व मनाला सुखच देते. आपल्या मुलीनं काकूबाई दिसावं असं कोणत्या आईला वाटेल ? आम्ही आपआपल्या जमान्याची फॅशन नव्हती केली का ? आई, देविका-राणी, काननबाला, लीला चिटणीसचे सिनेमे आणि आजी बालगंधर्वची नाटकं पाहून पातळं तश्या पद्धतीनं नव्हती का नेसत ? आम्ही आपल्या जमान्याची फॅशन केली, आमची पोरं त्यांच्या जमान्याची करतात.

बाप म्हणतो, 'अरे केव्हढे केस वाढवलेत हे. आमच्या काळी मवाली गुंडच असे केस वाढवायचे.'

पोरगा उत्तर देतो, 'डॅडी, आता कन्सेप्ट बदललाय्. आता असे केस न वाढवणारे मवाली गुंड समजले जातात.'


आपल्या मुलांनी आधुनिक दिसावं, जगाच्या स्पर्धेत मागे पडू नये म्हणून पालक फॅशनला संमती देतात; पैसा पुरवतात. इथंपर्यंत सारं ठीकठाक आहे.

पुढचा प्रश्न जरा नाजूक आहे. औचित्याचा उंबरठा ओलांडून फॅशन पुष्कळदा अनुचित अंगप्रदर्शनाकडे वळते, स्वस्त भडकपणाचे प्रदर्शन करू लागते, सामाजिक मर्यादा ओलांडू लागते. फॅशन मॉडेल बनून सडकेवर बेधडक हिंडणाऱ्या मुलं-मुली पाहून पुष्कळदा आमची मान शरमेनं खाली जाते. फॅशनच्या नावाखाली चाललेला उथळपणा समाजघातकी वाटू लागतो. समाजाशिवाय मनुष्याचं जीवनच असंभव आहे हे त्रिवार सत्य आहे. पुरोगामीपणा करता पुरेशी मर्यादा सोडूनसुद्धा, सभ्य सामाजिक जीवनाकरता औचित्याचे किमान सामाजिक संकेत पाळायलाच हवेत यात शंका नाही.

समाजात हरघडी आढळणाऱ्या ह्या भडक, अवास्तव व उथळ फॅशनकरता जबाबदार कोण ? स्वतः मुलं-मुली ? अनुकरण ? धनिक वर्ग ? समाजाची

पर्वा न करणारे मुठ्ठीभर लोक? सिनेमा? रूढीवादी समाजपद्धती? आधुनिकतेच्या नव्या कल्पना? ठामपणे म्हणावेसे वाटते, यापैकी काहीही नाही. काही अंशी स्वत: मुलं-मुली याला जबाबदार असल्या तरी अंतीम जबाबदारी स्वत: पालकांचीच आहे असं मला निश्चितपणे वाटतं. गुडघ्याच्या बरेच वर गेलेले अती तोकडे स्कर्ट घालून शाळेत जाणाऱ्या मुली पाहून वाटतं, यांच्या आयांना हे दिसत नाही का? भडक वेशभूषा व मेकअप करून मुलं-मुली घरातून बाहेर पडतात ते आईबापांच्या डोळ्यांदेखतच ना?

कमीत कमी वीस-एकवीस वर्षांपर्यंत मुलं-मुली आर्थिकदृष्टया पूर्णपणे पालकांवरच अवलंबून असतात. मुलं कितीही बंडखोर वा स्वतंत्र प्रकृतीची असली तरी ह्या काळात नाईलाजानं का होईना, आज्ञापालन करावंच लागतं त्यांना. 'मुलं ऐकत नाहीत' हे अर्धसत्य आहे. बऱ्याच बाबतीत मुलं ऐकतात व आईबापांच्या मर्जीप्रमाणेसुद्धा वागतात. पाश्चात्य संस्कृतीतल्या निर्बंध व्यक्तिस्वातंत्र्यान आमच्या कुटुंबपद्धतीत अजून तसा धुमाकूळ घातलेला नाही. मुलं कुटुंबापासून वेगळी होऊन संपूर्णपणे स्वतंत्र आयुष्य जगू लागेपर्यंत तरी आईबापांच्या बऱ्याच अंशी नियंत्रणात असतात. आर्थिकदृष्टया तर पालकांवर अवलंबून असतातच असतात. अती तोकडे वा अती घट्ट कपडे घालण्यास आईनं सक्त मनाई केली तर अवज्ञा करण्याची



मुलीची हिंमत होईल का?

समाजात आढळणाऱ्या अनुचित फॅशनला अशारीतीन पालकच हातभार लावतात आर्थिक भारही तेच वहन करतात. आपल्या मुलांनी खूप आधुनिक दिसाव, सगळ्यांच्या डोळ्यांत भरावं, ह्या इच्छेपोटी जास्त चिकित्सा न करता मुलांच्या सगळ्या मागण्या पुरवल्या जातात. आर्थिक सुबत्ता व अपत्यप्रेम हेही एक कारण असतंच. केवळ बाह्य फॅशनबरोबर आधुनिकता, असेही काही पालकांचे समीकरण असते काही आईबाप स्वतःच पाश्चमभक्त असतात व फॅशनचे सर्व अतिरेकी प्रकार त्यांच्या दृष्टीनं अत्याधुनिकतेत मोडतात. तेव्हा या सर्व कोणांतून पाहिल्यास मुलामुलींच्या अतिरेकी वा अनुचित फॅशनला पालकच जबाबदार आहेत, असं बेधडक म्हणावंसं वाटतं. ● ● ●



## जबानी चौथी । शेवटची
## हप्ता नववा

लेखक : नारायण सान्याल
अनुवादक : अशोक शहाणे

सेनापती म्हणाले-- बस् ! उरलेल्या अडीचशे सैनिकांची जबाबदारी मी मेजर जागीरसिंग न् मेजर ए. बी. सिंगवर सोपवतो. आज रात्री आपण सगळेच इथं मुक्काम करणार आहोत. ही अखेरची रात्र आहे. उद्या तुम्ही सगळे ह्या दोघा अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली आत्मसमर्पण करायला निघाल. आणि आम्ही पन्नासजण--

खान महंमदना आता राहवेना. रांगेतनं एक पाऊल पुढं येऊन तो म्हणाला-- साब ! मला माफ करा ! मी तुमच्याबरोबर येतो. जिवंत त्यांच्या हाती पडणार नाही मी ! मला शक्यच नाही ते !

--नाही ! ते व्हायचं नाही खान महंमद ! पन्नासच्यावर मला कुणालाच घेता यायचं नाही !

--लेकिन मेरी इज्जत ! मी खुदातालाला जबान दिलीय् हुजूर ! मी जिवंत शत्रूच्या हाती पडणार नाही !

--मला वाईट वाटतं कॅप्टन ! पण माझा नाइलाज आहे ! तुला आमच्या-

चालू लेखमाला

# मी नेताजींना बघितलंय

बरोबर घेणं शक्यच नाही मला !

--तो ठीक है ! यह लीजिये मेरा सॅल्यूट ! जयहिंद !

लष्करी सॅल्यूट ठोकला खान महंमदनी. अन् नळी आपल्या हनुवटीखाली लावून रायफलीचा घोडा ओढला ! त्या निस्तब्ध अरण्यानं किंकाळी फोडली. त्या शूर सैनिकाचा मृत देह सेनापतींच्या पायाशी पडला. खान महंमद शहीद झाले.

--यह तुमने क्या किया खान महंमद !

शहानवाजांनी हंबरडा फ डला.

पण हा काही शेवट नव्हता ही तर सुरुवात होती. एकामागोमाग एक फायरिंगचे आवाज ऐकू यायले लागले इथनं तिथनं सगळीकडनं ! आणखी काही सैनिक जमिनीवर कोसळले. एक-दोन-तीन--

त्यांना सहन होत नव्हता हा अपमान.

मेजर जनरल शहानवाजखान किंचाळले--Stop it ! I say stop it !

पण कोण कुणाचं ऐकतंय् ! परत फायरिंगचा आवाज झाला- एक-दोन-

लगेच शहानवाजखाननी कमरेचं रिव्हॉल्वर खेचून हातात घेतलं. ते स्वतःच्या कानशिलावर रोखलं.

अन् ते ओरडून म्हणाले-- आता फायरिंगचा एकही आवाज ऐकू आला, तरी आत्महत्या करीन मी !

मरायचा सोहळा संपला. बंद झाला. पुरतं एक मिनीट शहानवाज वाट बघत गप्प उभे होते.

मग म्हणाले-- भाई साब ! तुम्हाला काय वेड लागलंय् ? अशी आत्महत्या काय म्हणून करताय् ?

लहान पोरासारखा रडतरडत पुढं आला एक जवान. म्हणाला-- तुमच्या सेनापतीला मृत्युमुखात लोटून तुम्ही का म्हणून माघारी फिरलात भेकडासारखे, असं त्यांनी विचारलं तर आम्ही काय कैफियत देऊ ?

शहानवाजखान म्हणाले-- कैफियत काय द्यायची ते मी तुला सांगतो, दोस्त ! तुझ्यासारखीच माझीही अवस्था झाली होती एकदा ! मिकटिल्यात असताना. त्यादिवशी नेताजींनी मला जे सांगितलं होतं, तेच मी आज तुम्हाला सांगतो. जर कुणी तुमच्याकडे कैफियत मागितली तर सांगा-- 'आम्ही सैनिक आहोत ! आमच्या सेनापतीच्या जिवापेक्षा त्या सेनापतीच्या आदेशालाच आमच्या लेखी जास्ती महत्त्व आहे.' म्हणावं-- 'आम्हाला जो हुकूम दिला गेला, तो आम्ही पाळला ! बस् !'

ती रात्र आम्ही सगळे एकत्रच होतो. जड अंतःकरणानं आम्ही ती रात्र काढली. सहा सोबत्यांच्या प्रेतांवर पहारा देत. दमणुकीनं अंग मोडून गेलं होतं. पण झोप येईना कुणालाच.

रात्र संपली. सहा खड्डे खणले आम्ही. त्यात झोपवलं ह्या सोबत्यांना. कॅप्टन खान महंमदवर किती प्रेम होतं ते त्या-दिवशी उमगलं. मेलेल्या सोबत्यांना शेवटचा लष्करी सलाम करून आम्ही निघालो. डोळ्यांतलं पाणी पुसत-पुसत ते अडीचशेजण गेले आमच्याकडे पाठ फिरवून. मेजर जागीरसिंग न् मेजर ए. बी. सिंगच्या नेतृत्वाखाली. आत्म-समर्पण करायला.

पेगू-योमास रस्त्यानं थोडं अंतर काटल्यावर आम्ही डोंगरात शिरलो. ह्या डोंगरातच आपलं ठाणं लढवायचं असं आम्ही ठरवलं. आमच्याबरोबर पन्नास रायफली होत्या अन् प्रत्येकाकडे शंभर कांडतुसं होती. देवाला आमची आता प्रार्थना फक्त एवढीच होती की गुरु गोविंदजी ! नारायणा ! खुदाताला ! आमच्यावर चालून येणारी तुकडी भारतीयांची नसू दे ! ब्रिटिशांची असू दे ! आणखी काही मागणं नाही आमचं. बाकी सगळं मग आम्ही बघून घेऊ !

दुसऱ्या दिवशी—म्हंजे मेच्या चौदा तारखेला—संध्याकाळच्या सुमाराला आम्ही त्या डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या एका गावात येऊन पोचलो. अगदी छोटसं गाव होतं. नाव होतं लोगा.

आम्ही गावात शिरल्या शिरल्या पाऊस आला. झडझडून मुसळधार पाऊस. रिकाम्या झोपड्यातनं आम्ही आसरा घेतला; पण गाव पुरतं निर्जन नव्हतं. काही लोकं रहात होते गावातच. ही असली गावं म्हंजे तेव्हा ब्रिटिश हेरांचे अड्डे बनले होते. त्यामुळं आमच्या हालचालींच्या पुऱ्या बातम्या शत्रूला होत्या. पण काही इलाजच नव्हता. गाव सोडून निव्वळ डोंगरात राहून तर भागण्याजोगं नव्हतं. कारण जेवाय-खायच्या सोयीकरता गावाशी संबंध ठेवणं भागच होतं.

दोन दिवस आम्हाला ह्याच गावात काढावे लागले. बहुतेक गावकरी शत्रूला सामील आहेत हे समजत होतं आम्हाला. शत्रूची काहीच खबर आम्हाला लागत नव्हती. आमची मात्र प्रत्येकच बातमी त्यांना नीट मिळत होती.

तिसऱ्या दिवशी सेनापतींच्या आदेशाप्रमाणं आम्ही परत बाहेर पडलो. डोळ्यात तेल घालून दिवसभर चालत राह्यलो. पण कुठंच शत्रूची गाठ पडली नाही.

रात्री अकराच्या सुमाराला आम्ही एका अनोळखी गावात पोचलो. गावाचं नाव होतं सित्पिन्जिक्स. ते नंतर कळलं. इतक्या रात्री सगळ्यांनी गावात जाणं काही योग्य होणार नाही, म्हणून आम्ही गावापास्नं दोनशे गजांवर असतानाच थांबलो.

आम्हाला तिथं ठेवून मेजर-जनरल शहानवाजखान, कॅप्टन दिलवर हुसेन

अन् लेफ्टनंट रामनगीना शर्मा पुढं गेले. गावातली परिस्थिती बघायला.

आम्ही गावापास्नं निव्वळ दोनशे गजांवर होतो. मोकळा माळ होता. चांगलं चांदणं पडलं होतं. शुक्ल पक्षाची दशमी किंवा एकादशी असेल. ते तिघंजण गावाकडे जाताना स्पष्ट दिसत होते. मधे सेनापती अन् बाजूला दोघं.

गावापास्नं पंचवीस-तीस गज अंतरावर ते असताना गावातनं कुणीतरी ओरडलं—तुम कौन हो ?

शहानवाजखान ओरडून म्हणाले— आम्ही भारतीय फौजेतले लोक आहोत. तुम कौन हो ?

स्वत:ची ओळख न देता गावातल्या माणसानं परत विचारलं—कौनसी फौज ?

—आझाद हिंद फौज ? लेकिन तुम कौन हो ?

उत्तरादाखल गावातला माणूस म्हणाला—फायर !

लगोलग गावातनं मशिनगन अन् रायफलीच्या गर्जना ऐकू आल्या. आम्हीपण तात्काळ बंदुका सरसावल्या. सेनापती धावतच परत आले. पण दिलवर हुसेन अन् रामनगीना काही परतले नाहीत !

शहानवाजखानच्या हातात एक कातडी बॅग होती. ह्या बॅगला गोळी लागून ती त्यांच्या हातातनं पडली. ह्या बॅगमधेच त्यांची रोजनिशी होती ही रोजनिशीच नंतर लालकिल्ल्यातल्या खटल्यात शहानवाजखानच्या विरुद्ध सगळ्यात मोठ्ठा पुरावा म्हणून अॅडव्होकेट जनरल सर पी. एन. एंजीनयरनी पेश केली होती.

दिलवर हुसेन अन् रामनगीनाच्या मृत्यूचा बदला घेण्याकरता आम्ही ताबडतोब गावावर हल्ला चढवला पण आम्हाला अशाप्रकारे हल्ला करताना बघून ते गावाच्या दुसऱ्या टोकाला पळून गेले. नाइलाजानं आम्हालापण थांबावं लागलं. जरावेळानं लक्षात आलं की ते जागा बदलतायत. अवजड तोफा घेऊन जातायत इकडून तिकडे. आम्हाला चहूबाजूंनी घेरून टाकलं त्यांनी. तिथं काही आंब्यांची झाडं होती. आम्ही ह्या झाडांच्यामागं लपून बसलो.

सबंध रात्रभर आम्ही वाट बघत राह्यलो. पण त्यांनी आमच्यावर हल्ला केला नाही.

पहाट झाली. तेव्हा परिस्थिती ध्यानात आली आमच्या. आम्ही जिथं ठाण मांडलं होतं, त्याच्या चारीबाजूंना उंच टेकाड होती. सगळ्याच कोपऱ्यात त्यांनी तोफा डागून ठेवल्या होत्या. थोडक्यात तेपण रात्रभर जागतच होते.

शहानवाजखान म्हणाले — आपलं दुर्दैव असं की ते सगळेच भारतीय आहेत. त्यांच्यात एकपण ब्रिटिश सोल्जर दिसत नाहीय्.

कर्नल धीलन म्हणाले—ह्यांना मारून काही समाधान व्हायचं नाही आपलं.

मग शहानवाजनी आम्हाला एकत्र बोलावलं.

म्हणाले—'मृत्यु स्वीकारायचे तीन मार्ग आपल्यासमोर आहेत. पहिला न्

सगळ्यात सोपा उपाय म्हंजे आत्महत्या! पण ते भेकडपणाचं आहे. दुसरा मार्ग म्हंजे शत्रूच्या तोफखान्यासमोर निधड्या छातीनं उभं राह्यचं अन् तिसरा मार्ग म्हंजे शत्रूच्या हाती सापडायचं न् त्यांच्या हातनं मरायचं. ह्यातला दुसरा मार्ग सैनिकाला साजेसा आहे. पण तिसऱ्या मार्गात एक फायदा आहे. आपण त्यांच्या हातात जिवंत सापडलो तर बहुतेक ते आपल्याला भारतात घेऊन जातील. न् कोर्टमार्शलचं एक नाटक करून ते आपल्याला गोळ्या घालतील. त्यामुळं आपल्या प्रेतांना देशाच्या मातीतच कबर मिळेल. शिवाय आपला उद्देश काय होता ते पण मरायच्या आधी सांगायची संधी आपल्याला मिळेल. त्यातनं देशात नव्यानं बंडाचा वणवा भडकून उठायची शक्यता आहे. कॉम्रेड्स! इतकेदिवस मी तुमचा सेनापती होतो. मी हुकूम देत होतो, तुम्ही त्याची अंमलबजावणी करत होतात. पण आज काहीही हुकूम द्यायच्या आधी तुमचं मत जाणून घ्यायची माझी इच्छा आहे.

कर्नल धीलन म्हणाले—आत्महत्येचा काही प्रश्नच उद्‌भवत नाही! मला हा तिसराच उपाय जास्ती पसंत पडतोय्. ब्रिटिशांच्या गोळीनंच मरायचं तर मग अशा आडरानांत काय म्हणून? त्यापेक्षा भारतात फायरिंग स्क्वॉडसमोर उभं राहून मरूं या की! तिथं आपण जयहिंद म्हणून घोषणा दिली, तर ती पुकार भारतातल्या लोकांच्या कानी जाईल. आपल्या हातातनं पडलेला झेंडा भारतातली जनता उचलून घेईल!

तर तसंच ठरलं. संपून गेली आमची लढाई. आम्ही आत्मसमर्पण केलं. भारतीय बटालियन आम्हाला कैद करून घेऊन चालली. पहिल्यांदा बटालियनचं हेडक्वार्टर्स. तिथं आमची शस्त्रं काढून घेतली त्यांनी. मग ब्रिगेडच्या डिव्हिजनल हेडक्वार्टर्सवर. त्याचदिवशी संध्याकाळी.

आम्हाला रांग करून उभं राह्यला सांगितलं. समोर अधिकारी, मागं साधे सैनिक. अन् सगळ्यांच्यासमोर आमचे सेनापती मेजर-जनरल शहानवाजखान.

—अॅटेन्शन!

आम्ही होतो युद्धबंदी! हुकमाप्रमाणं अॅटेन्शनमधे उभे राह्यलो. युद्धबंद्यांची पहाणी करण्याकरता ब्रिगेड कमांडट पुढं आले.

कॅप्टन अन्वर हुसेन माझ्याशेजारीच उभा होता. तो हलक्या आवाजात म्हणाला—दोस्त! कोण आहे ते ओळखलंस का?

सत्यानास! कर्नल ए. टी. सिंप्सन!

पण त्याचं आमच्या कुणाकडेच लक्ष नव्हतं. ते सरळ येऊन उभे राह्यले मेजर-जनरल शहानवाजच्या समोर.

विचारलं—नांव काय?

—मेजर-जनरल शहानवाजखान!

कर्नलनी इशारा केला एका सैनिकाला. त्यानं आमच्या सेनापतींची लष्करी फीत ओरबाडून काढली.

कर्नलनी परत प्रश्न केला—आता बोल, नाव काय?

—शहानवाजखान!

--Right oh ! Don't say Major General again ! If you like to add distinctions to your name, better announce P.O.W. shah Nawaz Khan !

आम्ही दातांनी ओठ दाबून स्वतःला आवरलं.

—तुम्हीलोक कशाकरता लढत होतात इतके दिवस ?

—आमचा देश स्वतंत्र करण्या-करता !

—मग आत्मसमर्पण कशाला केलंत?

शहानवाजखान हंसले.

म्हणाले--' कर्नल ! डंकर्कला तुम्ही आत्मसमर्पण कशाला केलं होतंत ? अन् सिंगापुरांतदेखील आम्हाला सोडून तुम्ही का म्हणून पळून गेला होतात ?'

कर्नलचा चेहरा लालीलाल होऊन गेला. त्यांनी कसंबसं स्वतःला सावरलं.

म्हणाले—जपानी लोक तुला काय पगार देत होते.

--आमचा कुणाचाच पगार जपानी लोक देत नव्हते. आम्हाला पगार देत होते आमचे नेताजी ! डिव्हिजनल कमांडर म्हणून मला महिन्याला अडीचशे रुपये मिळत होते. म्हंजे आजच्या बाजारात अवघ्या काही कोंबडयांची किंमत !

—पण तुमच्या नेताजींना तरी इतक्या लोकांच्याकरता कोंबडयांचे पैसे कुठनं मिळत होते ? जपानकडनं ?

—नाही ! मुलकी भारतीयांनी आत्तापर्यंत स्वेच्छेनं नेताजींना दान केले होते करोड रुपये ! भारतातनं ब्रिटिशांना हाकलून काढण्याकरता !

हे ऐकल्यावर मात्र कर्नलना स्वतःचा राग आवरता आला नाही. त्यांनी एक लाथ मारली ! जमिनीवर ! म्हणाले—ह्या उद्धटपणाची सज्जा मिळेल तुला ! गोळी घालून मारून टाकू तुला !

शहानवाजखान परत हसून म्हणाले —ते मला माहीत आहे कर्नल !

कर्नलनी इशारा केला. दोघा अधि-काऱ्यांनी आमच्या सेनापतींना दोन्ही बाजूंनी धरून नेलं आमच्या नजरेआड.

मग कर्नल सिप्सन कर्नल धीलनच्या-समोर आले.

म्हणाले—तू कर्नल दिसतोयस ! नेक्स्ट-इन-कमांड ?

—हो !

—ह्या सैनिकांची काही यादी आहे का तुझ्याकडे ?

कर्नल धीलनची आमची यादी दिली त्यांच्या हातात. यादीवरनं नजर फिरवता-फिरवता एकदम दचकले कर्नल सिप्सन !

म्हणाले—कॅप्टन महंमद अन्वर हुसेन ! कुणाचं नाव आहे हे ?

दोस्त अन्वर रांगेतनं एक पाऊल पुढं झाला.

—Hello ! So we meet again !

मग परत नजर यादीवरच ठेवून कर्नल सिप्सन म्हणाले—लेफ्टनंट रामावतार शर्मा ? कोण आहे ?

कुणीच उत्तर दिलं नाही.

तेव्हा कर्नल सिप्सन कर्नल धीलनकडे वळून म्हणाले—तू दाखवून दे !

लेफ्टनंट रामावतार शर्मा कोण आहे ?

कर्नल धीलन म्हणाले——रामावतार शर्मा म्हणून कुणी नाही आमच्या तुकडीत ! यादीत पण ते नाव नाहीय् !

——पण लेफ्टनंट रामावतार शर्मा होता ना एकजण ! तो कुठाय् ?

——नाही ! ह्या नावाचं कुणी नव्हतं आमच्याकडे !

——नसेल तर ह्याचा जाब द्यावा लागेल तुला !

ही शेवटची धमकी अन्वरला होती. अन्वर दगडासारखा उभा होता. चेहऱ्यावरची एकदेखील रेघ हलली नाही त्याची.

मग कर्नल सिप्सन आमच्या सगळ्यांच्या पुढनं हिंडले. बारकाईनं न्याहाळत हिंडले. प्रत्येकासमोर ते उभे रहात होते. माझ्यासमोरपण उभे राहिले. लेफ्टनंट हरगोविंदसिंगच्या दाढी-मिशा-पगडीनं झाकलेल्या चेहऱ्याकडे त्यांनी निरखून पाहिलं. निघून गेले शेजारच्या माणसाकडे. नाही ! रामावतार शर्मा काही धुंडाळून मिळाला नाही त्यांना !

दुसऱ्या दिवशी आम्हाला पहारेकऱ्यांच्यामधनं मार्च करत घेऊन गेले. कुठं नेतायत ते काही माहीत नव्हतं आम्हाला. आमची सगळी शस्त्रास्त्रं न् ओळखपत्रं त्यांनी आधीच जप्त करून घेतली होती. प्रत्येक सैनिकाचं नाव न् नंबर वगैरे सगळं त्यांनी यादीशी ताडून बघितलं होतं.

डबल लाइन करून ते आम्हाला चालत घेऊन गेले. समोर अधिकारी, मागे साधे शिपाई. मशिनगन घेतलेले पहारेकरी चालतायत थोडयाशा अंतरावर. आमच्या आवाक्याच्या बाहेर. पण तसे आमच्या लगतच.

सेनापती शहानवाजखान सगळ्यात पुढं. मागं आम्ही सत्तेचाळीसजण. आमच्यातनं तिघं गळले होते आत्तापर्यंत. दिलवर हुसेन न् रामनगीना त्या गावात जायच्या तोंडाशीच. अन् अन्वर हुसेन तर अगदी आत्ताआत्ता ! अन्वर कुठाय्, त्याला का आमच्याबरोबर पाठवलं नाही——काही कळू शकलं नाही.

सकाळी आम्ही जेव्हा एकत्र जमलो तेव्हा कर्नल सिप्सननी आमच्या सेनापतींना आदेश दिला——त्यांना फॉल-इन करायला हुकूम दे.

शहानवाजखान खंबीरपणानं म्हणाले ——माझी लष्करी फीत परत मिळाल्याशिवाय मी त्यांचा सेनापती होऊ शकत नाही !

कॅप्टन रॉबर्ट्स म्हणून एक सहकारी होता कर्नल सिप्सनचा. त्याला कर्नलनी सांगितलं.

शहानवाजखान परत म्हणाले—— ह्यात एकजण कमी का म्हणून आहे ? कॅप्टन अन्वरला का आमच्याबरोबर पाठवत नाही ?

कर्नल सिप्सन म्हणाले——मिस्टर शहानवाजखान, एक गोष्ट तुम्ही विसरून गेलायत ! तुम्ही काही आता मेजर-जनरल नाही ! तुम्हाला बढती मिळाल्याय् ! आता तुम्ही पीओडब्ल्यू आहात !

चालतचालत आम्ही पेगू-जेलमध्ये

आलो. तुरुंगात असताना ब्रिटिशांच्या सैन्यांतले भारतीय सैनिक नेहमी आम्हाला आझाद हिंद सेनेबद्दल विचारायचे. खूप कुतूहल होतं त्यांना आमच्याबद्दल. आमची सगळी हकीगत ऐकल्यावर त्यांना वाईट वाटायचं. ब्रिटिशांच्या प्रचारामुळे आमची दिशाभूल झाली, नाहीतर हे सगळं आम्हाला आधी कळलं असतं तर आम्ही तुम्हाला येऊन मिळालो असतो--असं ते म्हणायचे.

मला अजुनी मधनंमधनं वाटतं. ब्रह्मदेशच्या आघाडीवर आमचा पराजय झाला तो काही निव्वळ ब्रिटिशांच्या जास्ती चांगल्या युद्धसामग्रीमुळं नाही. प्रचारातल्या त्यांच्या कौशल्यामुळं झाला. तुरुंगात कितीतरी अधिकारीदेखील आम्हाला 'आय. एन. ए'–चा अर्थ विचाराचे. आमच्या सैन्याचं एकच नाव त्यांना माहित होतं—'जिफ'! Jife! म्हंजे Japanese Inspirid Figth Columnist! ब्रिटिशांच्या प्रचारयंत्रणेची तारीफ करायला हवी, नाही का? दिवसाची रात्र कशी करावी हे त्यांना चांगलं अवगत होतं.

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात परत कडेकोट बंदोस्तात आम्ही पायीपेगूहून रंगूनला आलो. रंगूनला म्हंजे रंगूनच्या सेंट्रल जेलमधे.

इथं आल्यावर थोड्याच दिवसात मेजर-जनरल शहानवाजखान न् कर्नल जी. एस. ढीलनना विमानानं कलकत्त्याला हलवण्यात आलं. हसतमुखानं त्यांनी आमचा निरोप घेतला. ते म्हणाले—पुढच्या जन्मी स्वतंत्र भारतात परत भेटू या!

आम्हाला ठाऊक होतं की ह्यांचं आता कोर्टमार्शल होईल. मग ह्या दोघांना, फायरिंग स्क्वॉडसमोर उभं रहावं लागेल. पण आम्हाला हेच हवं होतं. त्यांचीही तशीच इच्छा होती. त्यांना हसतमुखानं निरोप न द्यायचं काही कारणच नव्हतं. सॅल्यूट करून आम्ही 'जयहिंद' म्हणून घोषणा दिली.

अन् आम्ही राहून गेलो इनशिनच्या तुरुंगात. रंगूनच्या सेंट्रल जेलमधे जागा कमी पडायला लागली, म्हणून त्यांनी आम्हाला इनशिनच्या जेलमधे हलवलं. आत प्रवेश करताना परत एकदा आमची झडती घेतली गेली. इथं सगळेच पहारेकरी लालतोंडचे होते. त्यांची ती लाल तोंडं पाह्यली की आमचं रक्त सळसळायला लागायचं. आम्ही मनातल्या-मनात म्हणायचो—बेट्यांनो, इतकेदिवस कुठं होतात? प्रत्यक्ष लढाईत गाठ पडली ती निव्वळ भारतीय सैनिकांशीच. कधी गुरखे, कधी पंजाबी, कधी मराठे. पण इथं मात्र पहावं तर जिकडेतिकडे लालतोंडचे! म्हंजे ब्रिटिश लोकही होते की ब्रह्मदेशच्या आघाडीवर!

पण मी काय सांगत होतो? हा—तर इनशिन जेलमधे शिरताना आम्हाला हुकूम सुटला-- हॉल्ट!

वारंवार तल्लाशी घेऊन पण त्यांचं समाधान होत नव्हतं. एका लालतोंड्या ऑफिसरच्या हुकमानं एका गुरख्यानं माझ्या रिकाम्या खिशात हात घालून पाह्यलं. काही मिळालं नाही. नव्हतंच काही.

लालतोंड्या म्हणाला--आता आत जा!

मी खाली वाकून इनशिन जेलच्या उंबऱ्याची धूळ कपाळाला लावली.

--काय करतोय्स?

मी म्हणालो--ते तुला कळायचं नाही साहेबा! ह्या जेलमधे नेताजींना ठेवलं होतं बऱ्याच वर्षामागं! ह्या उंबऱ्याला त्यांची पायधूळ लागलेली आहे.

साहेबानं चिडून हातातल्या छडीचा एक फटका लगावला माझ्या ओणव्या पृष्ठभागावर.

इनशिनच्या जेलमध्ये तीनेक हजार सैनिक होते आझाद हिंद सेनेचे.

तुरुंगातल्या हालअपेष्टांची कहाणी सांगून आता काही उपयोग नाही.

काही दिवस गेले असतील. एक दिवस हुकूम आला — चला!

आम्ही कैदी. त्यामुळं कुठं, कशाकरता वगैरे विचारायचा काहीच अधिकार नव्हता आम्हाला. तयार होण्याजोगं काही नव्हतंच. पाचच मिनटात सामान घेऊन आम्ही रांग करून उभे राहलो. गुरुबक्षसिंग, अमरसिंग, फत्तेसिंग, राजेंद्र, मन्सूरअली सगळे!

गेटसमोर काही लॉऱ्या उभ्या होत्या. त्यात आम्ही चढलो. दुसऱ्या एका लॉरीत मेडिकल युनिटचे काही डॉक्टर्स होते. तेही आझाद हिंद सेनेतलेच. आमच्याबरोबर पकडले गेले होते.

आम्ही रंगूनला पोचलो. ह्या खेपेला रंगूनच्या गोदीत. तिथं रंगूनच्या सेंट्रल जेलमधले खूप कैदी आलेले होते.

गोदीत आणलंय् त्याअर्थी प्रवास जहाजाचा आहे हे आलंच. पण आपल्याला नेणारायत कुठं? परतंत्र भारतात? का स्वराज्य-शहीद बेटावर? नाही, ह्या बेटांना स्वराज-शहीद म्हणून चालायचं नाही. आमच्या नशिबाबरोबर त्यांची नावं पण फिरल्यायत. परतएकदा अंदमान-निकोबार. का मग प्रशांत महासागरातल्या एखाद्या बेटावर नेतायत?

समुद्रात एक छोटंसं जहाज उभं होतं. होडीतनं आम्ही त्या जहाजात गेलो. संध्याकाळ झाल्यावर जहाज हळू हळू पाणी कापायला लागलं.

आम्हाला जागा मिळाली होती जहाजाच्या बिलकुल तळाशी. कशीबशी तीनशे लोकांपुरती जागा होती तिथं ह्या जागेत चारशे माणसं कोंबली होती त्यांनी. पण त्यांची काय चूक म्हणा! आमच्या नेताजींनींच एक दिवस हॉलवेल मॉन्युमेंट उखडून टाकायचा बेत केला होता. ह्याचा सूड ते घेणारच की!

आधीच भाद्रपदातला गुदमरवून टाकणारा उकाडा. त्यात अजिबात वारा येत नव्हता त्या अंधारकोठडीत. डोक्यावर एक छोटंसं भोक. त्यातनं जिना खाली आलेला.

दिवसातनं दोनदा आम्हाला वर घेऊन जायचे. पाळीपाळीनं. डेकवरची मोकळी हवा खाऊन झाली की परत आम्ही ह्या अंधारकोठडीत यायचो. आम्ही म्हंजे त्यांना कासवा-सुसरीसारखे वाटत होतो का काय कोण जाणे! चोवीस तासात दोनदा छातीत ऑक्सिजन भरून घेतला नाहीतर आम्ही मरूनच गेलो असतो.

दुसऱ्याच दिवशी ह्या अंधारकोठडीत एकजण आला न् मला म्हणाला—

जयहिंद सरदारजी ! तुम्हाला कुठंतरी पाह्यल्यासारखं वाटतंय् ! कुठं असेल बरं ?

मी त्यांना ओळखलं होतं. म्हणून मग म्हणालो-- तुम्हीच सांगा ना !

--चेहरा ओळखीचा वाटतोय् ! पण नेमकं लक्षात येत नाहीय् !

मग मी हसून म्हणालो-- मिकटिल्याला गाठ पडली होती आपली ! त्या रात्री तुम्ही आम्हाला मोडाचे हरभरे खाऊ घातले होतेत ! जीप चालवून आलो होतो आम्ही ! एक बादली पाणी दिलं होतंत तुम्ही मला !

--ओ येस ! आत्ता आठवलं ! मी सत्येंद्रनाथ बोस.

मी म्हणालो-- तेव्हा तुम्हीं कॅप्टन होतात म्हंजे आत्ता नक्कीच मेजर झाला असाल !

ते म्हणाले-- नाहीं ! तेव्हा कॅप्टन होतो, आता नुस्ताच डॉक्टर आहे ! माझी लष्करी फीत त्यांनी काढून घेतली. पण तुमचं नाव तर सांगाल !

--सरदार हरगोविंदसिंग !

'हा डॉक्टर मोठा प्रेमळ माणूस होता. चांगलीच दोस्ती होऊन गेली त्यांच्याशी. ते जिरावादीला होते. त्याच्याआधी मेमिओला. न् त्याच्याहीआधी एकदम आघाडीवरच्या इस्पितळात. डॉक्टर बोसांचे थोरला भाऊ हेमदादापण मोठा दिलखुलास माणूस होता. आम्ही नेहमी गप्पा मारत बसायचो. कुणीकुणी पत्ते खेळायचे. पण पत्ते काही मला यायचे नाहीत.

एकदिवस हेमदादा म्हणाले--अच्छा सरदारजी, रंगूनच्या त्या सभेत सात लाख डॉलर देऊन नेताजींचा हार तुम्हीच घेतला होतात ना ?

--नाही ! सात लाख डॉलरला नाही ! पण तुम्हाला कुणी सांगितलं हे सगळं ?

--तुमच्या मित्रानं ! गुरुबक्षसिंगनं !

मी हसलो.

हेमदादा म्हणाले--तर मग तुम्हाला मी एक मजेदार गोष्ट सांगतो. तेव्हा मी मेमिओ इस्पितळात होतो. तेव्हा म्हंजे ह्याच वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यात. आमच्या युनिटमधे राणीवाहिनीतल्या काही मुली नर्स म्हणून काम करत होत्या. त्यांच्यातली एक मुलगी दिसायला भलतीच सुंदर होती. सगळेजण तिला 'भाबीजी' म्हणायचे. नंतर तिचं नाव कळलं. सुभद्रा जयस्वाल. मिस सुभद्रा जयस्वाल. मला आश्चर्य वाटलं. 'मिस' न् 'भाबीजी' कशीकाय ? एका नर्सला मी सहज विचारलं. तर ती म्हणाली की ह्या सुभद्रेचं लग्न ठरलंय् एका सरदारजीशी. रंगूनच्या त्या सभेत आपलं सर्वस्व देऊन नेताजींच्या गळयातला हार ज्यानं विकत घेतला होता ना, त्या सरदारजीशी. माफ करा सरदारजी, पण ही मुलगी ओळखीची आहे का तुमच्या ?

--हो ! पुढं कुठं गेली ती काही माहीत आहे ?

--आहे ना ! लढाईची हालत आणखी बिघडली तेव्हा मेमिओचं इस्पितळ हललं. आम्ही सगळं जियावादीला आलो. अन् संबंध राणी युनिट गेलं थेट रंगूनला. नंतर नेताजी रंगून सोडून गेले तेव्हादेखील हे डिटॅचमेंट

रंगूनलाच होतं अन् ह्या सगळ्या मुली नेताजींच्याबरोबरच मौलमीनला गेल्या असंच मी तरी ऐकलंय्.

मेजर सत्येंद्रनाथ बोस म्हणाले—हेमदादा, ह्या सुभद्रादेवींची ही गोष्ट तुम्ही मला सांगितलीच नव्हतीत कधी!

—ह्यात सांगण्याजोगं असं आहेच काय बाबा? खरं म्हंजे आजसुद्धा तिची गोष्ट निघाली नसती. पण तो हार विकत घेणारे ते हेच म्हणून योगायोगानं कळलं तेव्हा म्हटलं मिस जयस्वालची शेवटची खबर ऐकून बरं वाटेल कदाचित् ह्यांना.

—शेवटची खबर? म्हंजे?

हबकूनच गेलो मी.

—नाही नाही! तसं काही नाही! शेवटची खबर म्हंजे मला लागलेली तिची शेवटची खबर? म्हजे नेताजींच्याबरोबर मौलमीनला जाणं! एवढंच!

मेजर बोसांनी एक मोठा सुस्कारा टाकला.

ते म्हणाले—हेमदादा! ही गोष्ट तू महिनाभर आधी जरी मला सांगितली असतीत तरी एका माणसाचं काही भलं झालं असतं!

—कुणाचं? हा आणखी काय प्रकार आहे?

मेजर बोस म्हणाले—हेमदादा, तुम्ही तर होतात रंगूनच्या सेंट्रल जेलमधे! ही गोष्ट आहे इनशिनची. त्यामुळे माहीत नसेल तुम्हाला. कॅप्टन मकसूद न् कॅप्टन नागरत्नमला माहीत आहे ही गोष्ट.

इनशिनला यायच्याआधी खूप जुन्या दोस्तमंडळींच्या गाठी पडल्या होत्या परत एकदा. मोठाल्या पाच बराकी होत्या दुमजली. त्यात आपल्या मंडळींना ठेवलं होतं. आम्ही इस्पितळाच्या बराकीत: आम्ही म्हजे डॉक्टरलोक न् पेशट्स.

मग असं कानावर आलं की इनशिनला काही आणखी कैदी ठेवायला जागा नाही. कारण ब्रह्मदेशात ब्रिटिशांचं इतकं सैन्य जमा झालेलं होतं की त्यांचीच राह्यची सोय होत नव्हती. त्यामुळं त्यांना ह्या जेलमधे ठाण मांडायचं होतं

मग जेलपास्नं चार मैलांवर आमच्याकरता तंबू टाकले गेले. जुलैच्या मध्याच्या सुमाराला आम्हाला ह्या तंबूत आणून भरलं.

चारी बाजूंनी काटेरी तारांचं उंच कुंपण. अन् चार कोपऱ्यात उंच चौक्यात मशिनगन घेऊन ब्रिटिश पहारेकरी. एकशेसाठ पौंडी तंबूत आम्हाला सोळा जणांना कोंबून भरलं.

इथंच एका वेडचाची गाठ पडली. प्रौढ कसला, चक्क म्हाताराच होता तो. प्रचंड श्रीमंत होता म्हणे लढाईच्या आधी. लढाई चालू असतानापण चिक्कार पैसा कमावला होता म्हणे. बायको मरून फार वर्षं झालेली. संसार म्हणता होती एकुलती एक मुलगी. तीपण राणीवाहिनीत भरती होऊन बापाशी भांडून घर सोडून निघून गेली. सरतेशेवटी हा म्हातारापण आला आझाद हिंद सेनेत भरती व्हायला म्हणून. पण म्हातारा असल्यामुळं त्याला सैन्यात दाखल होता आलं नाही. तरी ऑफिसर्स ट्रेनिंग स्कूलमध्ये त्यांना घेतलं.

चीफ-ऑफ-स्टाफनं आपल्या कचेरीत त्यांना काम द्यायचं कबूल केलं होतं.

पण आपण शरणागती पत्करल्यानं त्यांना कामाची काही संधीच मिळाली नाही. नेताजींनी सबंध आझाद हिंद सेनेला आत्मसमर्पण करायचा आदेश दिलाय् असं त्यांना कळल्यावर त्यांचं डोकंच फिरलं !

आमच्या बंदीशिबिरातच होते ते. रोज आमच्याकडे यायचे अन् चिक्कार् वेळ बडबड करत राह्यचे. बँकॉक, सिंगापूर, रंगूनचा धंदा कसा काय चाललाय् ? किती ओव्हरड्राफ्ट काढतोय्, नवीन शाखा कुठंकुठं खोलतोय्—वगैरे बडबड चालायची त्यांची.

आमच्यातले बरेचजण वैतागायचे. आम्ही समजूत घालून त्यांना शांत करायचो.

आमच्यात जोशी नावाचा एक मराठी ब्राह्मण होता. त्यालाच हे म्हातारबुवा गुरू मानायला लागले. एवढंच काय पण आठवड्यातनं एक दिवस मौन पण पाळायला लागले.

ह्या जोशी होता आमच्याच तंबूत. त्यामुळं हे म्हातारबुवा रोजच सकाळी आमच्या तंबूत येऊन बसायचे गुरुजींच्या सेवेकरता.

जोशीपण वैतागून जायचा पण त्याचा काहीच उपयोग व्हायचा नाही. शेवटी म्हातारबुवांची अखंड बडबड थांबवण्याकरता आम्ही एक नवीच युक्ती शोधून काढली. ते आले रे आले की आम्ही एका कागदाच्या चिटोऱ्यावर लिहून द्यायचो—आज माझा मौनदिन आहे. मग त्यांना पण गप्प बसायला लागायचं

संधी साधून मधेच मी विचारलं—नाव काय हो ह्या गृहस्थाचं ?

माझ्या प्रश्नाकडे कानाडोळा करून डॉक्टर बोस म्हणाले—एकदिवस संधी साधून त्यांनी मला एकट्याला पकडलं. आपल्या दुर्दैवाची कहाणी त्यांना ऐकवायची होती मला. म्हटलं, वेडा माणूस आहे, मनात साचून राह्यलेलं दुःख बोलून टाकून ह्याचं मन हलकं होत असेल तर आपण कशाला नाही म्हणा ? बराचवेळ ते आपली दुर्दैवाची कहाणी सांगत गेले. त्यांची मुलगी—सुभद्रा जयस्वालची कहाणी, त्यांचा जावई व्हायला बघणाऱ्या एका तरुण शिखाची कहाणी ! सगळं सांगत गेले चिक्कार वेळपर्यंत.

माझ्या प्रश्नाचं उत्तर त्याच्या बोलण्यातनं मिळून मला गेलंच होतं म्हणून मग मी विचारलं—काय झालं ह्यांचं सरतेशेवटी ?

—ते काही माहीत नाही मला ! ते तिथंच आहेत. ठार वेडा माणूस हो !

—सर ?

—कोण आहे ?

—मी सर ! मच्छरदाणी लावून टाकू का सर ?

मी घड्याळ बघितलं. रात्रीचे तीन वाजले होते. उजाडायला अजून तीनेक तास अवकाश होता.

ती रात्र कँप-चेअरमधे बसूनच जागत घालवली मी.

आणखी सहा तासांनी पाकिस्तानी सेनापती ब्रिगेडियर अन्वर हुसेनसमोर

उभं रहायचंय्. हिंदुस्थान पाकिस्तानच्या सरहद्दीवरल्या त्या अत्तेरी गावातल्या बाँबनं पडझड झालेल्या दरग्यात.

दीडेक मैलावर दोस्त अन्वरदेखील कदाचित् डेक-चेअरवर बसला असेल पूर्वेकडे तोंड करून. त्याच्याही डोळ्यात झोप नसेल. त्यालाही आज रात्री नक्कीच झोप यायची नाही

एकोणीसशे शेहेचाळीस ते एकोणीसशे-पासष्ट! एकोणीस वर्षांत आमच्या दोघांची काही गाठभेटच नाही! तेव्हा आम्ही होतो पंचविशीत. सव्वीस-सत्ता-वीस वय असेल तेव्हा. म्हंजे आज पंचेचाळीशी झाली की! गाठ पडली तेव्हा आम्ही दोघंही होतो अविवाहित. आता दरम्यान अन्वरनं लग्न केलंय् का नाही तेहो माहित नाही मला.

रंगूनहून जहाजातनं निघाल्यापास्नं परतंत्र काय अन् स्वतंत्र काय——भारतात त्याची-माझी गाठभेटच नाही. त्याचा देशाचा पक्का ठिकाणा लिहिलेला होता माझ्याजवळ एका डायरीत. पण ती डायरी जप्त केली ब्रिटिशांनी. त्यामुळं ह्या अवाढव्य दुनियेत आम्ही दोन माणसं बेमालूम हरवून गेलो.

पण कानावर आलं होतं की तो पाकिस्तानी सैन्यात भरती झालाय्. चढत चढत खूप मोठ्या हुद्द्यावर गेलाय्.

आता मी भारतीय सैन्यात भरती झालो ही देखील एक विश्वास न बसण्याजोगीच गोष्ट आहे की. पण मी काही दुसऱ्या महायुद्धाच्या आधीपास्नं भारतीय सेनेत नव्हतो ना, त्याचमुळं लष्कराच्या दप्तरात माझ्याविरुद्ध विश्वासघाताचा आरोप लिहिलेला नव्हता! शहानवाजखान, धीलन, सैगल वगैरे मंडळींचा बाकी राह्यलेला पगार-पण भारत सरकारनं दिला नाही—स्वतंत्र झाल्यावरदेखील दिला नाही—कारण त्यांनी म्हणे भारताचा विश्वास-घात केला होता — भारतीय सेनेच्या-विरुद्ध त्यांनी शस्त्र हाती धरलं होतं.

माझ्याविरुद्ध काही हा आरोप नव्हता. शिवाय डोक्यावर खादी टोपी घातलेल्या एका बड्या धेंडानं मला शिफारसपत्रही दिलं होतं! हा बडा असामी काही नाही आता. ह्या जगाचा निरोप घेतला त्यानं! शिवाय त्यानं उपकारही केलेत माझ्यावर! तेव्हा त्याचं नावगाव सांगत नाही इथं!—थोडक्यात म्हंजे मला चाकरी लागून गेली भारतीय सैन्यात!

अन्वरची-माझी शेवटची गाठ पडली होती पंचेचाळीस सालच्या मे महि-न्याच्या एकवीस तारखेला. मेजर-जनरल शहानवाजखान न् अन्वर हुसेनला आमच्यातनं बाजूला घेऊन गेले ब्रिटिश पहारेकरी कर्नल सिंप्सनच्या हुकमानं. नंतर काही गाठच पडली नाही अन्वरची.

गाठ पडली नसली तरी खबर मिळाली होती डॉक्टर बोसांच्याकडनंच. खबर मिळाली होती रंगूनहून जहा-जातनं भारतात येत असतानाच.

डॉक्टर बोसांनी एक दिवस विचा-रलं— अच्छा सरदारजी, कॅप्टन, रामा-वतार शर्मा तुमच्या ओळखीचा होता

का ?

मी दचकलोच !

मी म्हणालो--का बरं ?

माझ्या प्रश्नाचं उत्तर न देता डॉक्टर म्हणाले-- अच्छा, कॅप्टन महंमद अन्वर हुसेनला तरी ओळखता का नाही ?

--हो ! ओळखतो ना ! आमच्याच कंपनीत होता ना तो ! तुमची कशी-काय ओळख झाली त्याच्याशी ?

--निव्वळ योगायोगानं ओळख झाली. कैद्यांच्या छावणीत डॉक्टर कमी असल्यानं मला भारतीय रोग्यांची देख-भाल करायला लागायची. छावणीतल्या आमच्या ह्या इस्पितळात एक दिवस आला एक मरायला टेकलेला पेशंट ! धिप्पाड जवान होता चांगला ! राक्षसा-सारखं शरीर होतं ! अन् त्याच्यावर होत्या चाबकाच्या जखमा ! त्याची ही दशा बघून मला गप्प राहवेना. मी कँप-कमांडरकडे जाऊन तक्रार केली.-अशा प्रकारे चाबूक मारणे बेकायदेशीर आहे, त्यापेक्षा तुम्ही त्याला गोळी का घालत नाही -- असं चिडून म्हणालो.

कमांडर माझ्यावर खुष असायचा त्यामुळं रागावला नाही. म्हणाला-- डॉक्टर, ही गोष्ट काही तुझ्या अखत्या-रीतली नाही. पण तू म्हणतोयसच म्हणून सांगतो. 'मिलिटरी ऑपरेशन एरियात स्पेशल पॉवर ऑर्डिनान्स'च्या दुसऱ्या भागातल्या तेवीस नंबर कलमा-प्रमाणं चाबूक मारणं काही बेकायदेशीर नाही ! त्याच्या गुन्ह्याच्या गंभीरपणाचा विचार करूनच त्याला ही सजा दिल्याय् ! पण तू काही काळजी करू नकोस त्याची.

पेशंटचं औषधपाणी माझ्याकडेच होतं. त्याच्या जखमा बऱ्या व्हायला पंधरा दिवस लागले. पण तो जगला ते काही औषधपाण्यानं नाही. प्रचंड मनो-बळाच्या जोरावरच तो जिवंत राहला होता. त्याचं नाव मला कळलं होतं कॅप्टन महंमद अन्वर हुसेन.

एक दिवस विचारलं होतं मी त्याला -- तुला का असं चाबकानं मारलं रे ? काय केलं होतंस तू ?

तर म्हणाला-- मित्राचा विश्वास-घात करायला मी तयार झालो नाही म्हणून त्यांनी चाबूक चालवला माझ्यावर.

कुतुहलानं मी मेजर बोसांना विचा-रलं-- कोण मित्र ? अन् प्रकार तरी काय होता ?

ते म्हणाले--सविस्तर त्यानं काहीच सांगितलं नाही. त्याचा एक मित्र होता कॉम्रेड रामावतार शर्मा म्हणून. तो कुठं गेला ते काढून घ्यायचं होतं ब्रिटि-शांना त्याच्याकडून. एवढंच सांगितलंन् त्यानं.

--पण त्यानं सांगून टाकायचं की तो लढाईत मेला म्हणून !

--तसंच सांगितलं होतं त्यानं आधी ! पण ब्रिटिश कर्नलनं कुराणावर हात ठेवून शपथ घ्यायला सांगितलं त्याला !

तर असा हा अन्वर हुसेन !

(क्रमशः)

राष्ट्र सेवा दलाचे एक अभिनव 'गाईड'

# वाटा : माझ्या-तुझ्या

पुस्तके

निशिकांत मिरजकर

'वाटा : माझ्या-तुझ्या' हे पुस्तक मी वाचत होतो, तेव्हा माझ्या हातातून सहज कुतूहलाने पुस्तक घेऊन चाळणाऱ्या काही मित्रांच्या गंमतीदार प्रतिक्रिया मला प्रथम नोंदवाव्याशा वाटतात. माझ्या एका तरुण अविवाहित प्राध्यापक मित्राला पुस्तकाच्या नावावरून ती एखादी भाऊक कादंबरी किंवा फारतर प्रेमकवितांचा संग्रह असावा असे वाटले; आणि पुस्तक चाळताना त्याचा भ्रमनिरास झाला. कुरुंदकरांचे 'धार आणि काठ' हे पुस्तक वाचलेल्या दुसऱ्या एका प्राध्यापक मित्रांना हा समीक्षा-लेखांचा संग्रह असावा असे वाटले; तर पुस्तक उघडल्याबरोबर त्यातली प्रश्नोत्तरांची विशिष्ट मांडणी पाहून 'हे कुठल्या परीक्षेचं गाईड आहे ?' अशी पृच्छा तिसऱ्या एका प्राध्यापक मित्रानी केली. एक वर्षापूर्वी प्रसिद्ध झालेले कुरुंदकरांचे हे पुस्तक स्वतःला बुद्धिजीवी म्हणविणाऱ्या वर्गात कितपत पोचलेले आहे, याची ही सहज आढळलेली आलेखने मला मोठी गंमतीदार वाटली; आणि या पुस्तकाविषयी लिहिण्याची आवश्यकता जास्त तीव्रतेने जाणवू लागली.

खरोखरीच या पुस्तकाची रचना एखाद्या 'गाईड'सारखी आहे. ठळक टाईपात छापलेले प्रश्न आणि नेटक्या मुद्देसूद, अनाग्रही भाषेत त्यांना दिलेली स्वच्छ उत्तरे. मात्र हे गाईड कोणत्याही परीक्षेसाठी नाही. आजच्या भारतीय परिस्थितीच्या संदर्भात जे प्रश्न निर्माण होत आहेत, भेडसावत आहेत, त्याबाबतची स्पष्ट कल्पना असणे आत्यावश्यक वाटल्यावरून डॉ. अंबिके यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत आणि प्रा. नरहर कुरुंदकरांनी त्या प्रश्नांना नेटकी उत्तरे दिली आहेत. श्री. यदुनाथ थत्ते यांनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे, डॉ.

अंबिके यांच्या षष्ठ्यब्दिपूर्तीच्या वर्षात कुरुंदकरांनी हा अपूर्व उपाहार त्यांना आणि त्या निमित्ताने मराठी तरुणांना दिला आहे. विविध विचार समजून घेण्याची विद्यार्थीवृत्ती ज्याच्या ठिकाणी असेल, त्याला या पुस्तकाचे मोल वाटल्यावाचून राहणार नाही.

## महत्त्वाचे निष्कर्ष

प्रत्येक संदिग्ध कल्पना तळापासून तपासून तिचे मूळ स्वरूप स्पष्ट करणे हे कुरूंदकरांच्या विवेचनाचे स्वरूप आहे. 'राष्ट्र ही इंद्रियाच्या प्रत्ययाला येणारी कोणतीही वस्तू नव्हे. तर ती सुसंस्कृत समाजाने स्वीकारलेली अशी एक कल्पना आहे.' अशा निःसंदिग्ध वैचारिक विश्लेषणाच्या पातळीवर प्रारंभ करून राष्ट्रवादासंबंधी काही महत्वाचे निष्कर्ष कुरुंदकरांनी सांगितलेले आहेत. 'राष्ट्र या कल्पनेचा आधार... एकतेची जाणीव हा आहे....धर्म एकच असला म्हणजे राष्ट्र निर्माण होते किंवा असलेले राष्ट्र टिकते ही समजूत भोळे-पणाची आहे. धर्म जरी एक असला तरी अन्यायाची जाणीव या एकतेला लुळीपांगळी करीत असते.' असा मूल-भूत सिद्धांत मांडून 'धर्माच्या आधारे राष्ट्र निर्माण करण्याचा येथे प्रयत्न झाला तर त्यातून असलेल्या राष्ट्राची अनेक शकले उडतील' असा इशारा ते इतिहासाच्या परिशीलनातून देतात; तेव्हा धर्माची शक्ती त्यांना अमान्य असते असे नाही. पण धर्माखेरीज जीवनातील इतरही शक्तींचा साकल्याने विचार करून त्यांनी आपले मत बन-विलेले असते. राष्ट्राचा इतिहासातील विकास आणि ऱ्हास यांचे डोळसपणे निरीक्षण करून त्यांनी आपली मते निश्चित केलेली आहेत, असे या लहान-नशा पुस्तकातही ठायी ठायी जाणवते. पुन्हा या निरीक्षणाला विलक्षण सहानु-भूतीची आणि अनाग्रही विचारमंथनाची जोड लाभलेली आहे. सुजाण राष्ट्रवाद आणि आंधळा राष्ट्रवाद यातील नेमका फरक स्पष्ट करताना याचा प्रत्यय येतो. 'आपला धर्म, आपली संस्कृती आपली परंपरा इतरांवर लादण्याचा उघड किंवा सुप्त हेतू म्हणजे आक्रमक राष्ट्रवाद. हा आक्रमक राष्ट्रवाद फक्त इतिहासातील सोयीस्कर बाबी घेतो. त्याही उपयोगी बाबीच घेतो असे नाही तर निरुपयोगी बाबीही घेतो. म्हणून या आक्रमक राष्ट्रवादाला आंधळे म्हणायचे.' यासारखे सडेतोड, परंतु सुस्पष्ट व साधे विश्लेषण अप्रबुद्धांनाही जागे करणारे असते. इष्ट त्या विचारा-कडे धक्के न देता, जबरदस्ती न करता, स्वयंप्रेरणेने जावयास लावणारे असते. कुरुंदकरांचे विवेचन कुठेही स्वमत-प्रचाराचा अभिनिवेश बाळगत नाही, की परमतखंडनाच्या आवेशाने बेभान होत नाही. विचारप्रवृत्त करण्यासाठी मार्ग दाखवायला मात्र ते तत्परतेने पुढे सरसावते, आपण अंतिम सत्य सांगत आहोत असा दावा ते करीत नाहीत, पण अंतिम सत्यशोधनासाठी सोपा मार्ग आपण दाखवत आहोत हा आत्मविश्वास त्यांच्या शब्दांना नेमकेपणा नि वजन प्राप्त करून देतो.

बऱ्याच वेळा काय होते, की आपण

काही विकसित कल्पना घेऊन इतिहासाकडे पहात असतो; आणि त्या कल्पनांना विनाकारण भावनात्मक संघर्ष जोडून टाकतो. कुरुंदकरांनी हे अतिरेकी तणाव काढून टाकून स्वच्छ मोकळ्या मनाने इतिहासाचे मूल्यमापन व विश्लेषण चर्चेच्या अनुषंगाने केलेले आहे. हिंदू राष्ट्र कसे आणि केव्हा निर्माण झाले, त्याचे स्वरूप कसे होते, वगैरे चर्चा करून, 'मुसलमान हिंदुस्थानात येण्याच्यापूर्वीही हिंदू प्रजा गुलामच होती. फक्त ती स्वधर्मीय, उच्च वर्णीयांची गुलाम होती.' असे परखड निष्कर्ष त्यातून सिद्ध केले आहेत. कदाचित कुरुंदकरांच्या या निष्कर्षाशी अनेकजण सहमत होणार नाहीत. मुसलमान या देशात येण्यापूर्वीच्या हिंदू प्रजेच्या स्थितीचे अधिक विश्वासार्ह चित्र रेखाटणे शक्य आहे असे काहींना वाटेल. काहीजण भावनात्मकदृष्टया हे निष्कर्ष मान्य करणार नाहीत. पण कुरुंदकरांच्या विश्लेषणाची सुसंगती आणि प्रामाणिकता मात्र कुणालाही नाकारता येणार नाही. त्यामुळे 'ज्या राष्ट्रीयत्वाचा आपण पुरस्कार करतो ती सिद्ध असणारी वस्तू नव्हे हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. ती वस्तू आपण तत्त्वत: मान्य केलेली आहे. पण व्यवहारत: अस्तित्वात आणण्याची अजून शिल्लक राहिलेली अशी वस्तू आहे.' किंवा 'जे लोक राष्ट्राच्या नावे रोज जप करतात, पण समान संधी आणि न्याय याला मात्र विरोध करतात ते खोटे राष्ट्रवादी आणि राष्ट्रीय ऐक्याचे खरे अडथळे आहेत.' यासारखी विधाने धाडसी वाटली, तरी अतिरेकी वाटत नाहीत. भारतीय संस्कृतीच्या विविधतेत एकता अनुभवण्याच्या स्वप्नाची कुरुंदकरांनी केलेली मीमांसा तर अप्रतिम आहे. विविधता कोठे असावी, ऐक्य कोठे असावे आणि दोन्हींचे असणे किती आवश्यक आहे, त्याची सूक्ष्म चिकित्सा करून विविधतेत एकता हे लोकशाहीचे सूत्र कसे आहे ते त्यांनी फारच चांगले सुस्पष्ट केले आहे.

## ग्रहदूषित विधाने

परंतु दुर्दैवाने या विविधतेत एकता साधणारे हिंदूधर्माचे पुरातन रूप मात्र कुरुंदकरांना गवसत नाही. एरवी इतिहासाची तर्कशुद्ध विचिकित्सा करणारे कुरुंदकर हिंदू धर्माविषयी बोलण्याचा प्रसंग आला म्हणजे मात्र ग्रहदूषित विधाने करू लागतात याचे आश्चर्य वाटते. हिंदूंना आपल्याखेरीज इतर सर्व धर्म अतिरेकी अहिंसावादी, अत्याचारी अगर ढोंगी वाटतात; गुलामगिरीचे निर्लज्ज समर्थन हिंदू धर्म करतो; हिंदूंच्या तत्त्वज्ञानात जगातील सर्व धर्मांच्या तत्त्वज्ञानापेक्षा उच्च, उदात्त, भव्य, सूक्ष्म असे काही नाही; अद्वैत तत्त्वज्ञानाचा पुष्कळसा भाग बौद्धांच्याकडून उचललेला आहे, इत्यादी कुरुंदकरांची विधाने पारखून पाहण्यासारखी आहेत. हिंदूंना जर आपल्याखेरीज इतर सर्व धर्म अत्याचारी अन् ढोंगी वाटत असते, तर जैन, बौद्ध, फार काय इस्लाम व ख्रिस्ती धर्मांनाही हिंदुस्थानात सहिष्णुतेचे स्थान मिळाले नसते. 'सर्व

धर्मांना पोटी सामावून घेऊन शिल्लक राहणारा' असा हिंदुधर्माचा गौरव परधर्मीयांनी केला नसता. गुलामगिरीचे निर्लज्ज समर्थन हिंदू धर्माने कोठे केलेले आहे? हिंदू धर्माला पुनर्जन्माची आणि पापपुण्याचे फळ भोगावे लागण्याची कल्पना मान्य आहे एवढ्या आधारावर कुरुंदकरांनी रचलेले ते तर्कट आहे. हिंदू धर्माला नैसर्गिक विषमता मान्य आहे पण ही विषमता म्हणजे गुलामगिरी नव्हे. 'सर्वभूती भगवद्भाव' हा या विषमतेतही एकता साधण्याचा मंत्र आहे. आजच्या काळाच्या कल्पना प्राचीन काळावर लादून आपल्याला सोयीस्कर निष्कर्ष काढण्याच्या मोहाला कुरुंदकर देखील बळी पडलेले पाहून आश्चर्य वाटते. सर्व जगाने गौरविलेल्या उदात्त हिंदू तत्त्वज्ञानात कुरुंदकरांना भव्यता दिसत नाही हा त्या तत्त्वज्ञानाचा दोष की कुरुंदकरांच्या दृष्टीचा? हिंदू धर्म व बौद्ध धर्म यात पुरातन धर्म कोणता, आणि कोणी कोणाकडून कसली उसनवारी केली ही गोष्टदेखील इतिहासाच्या साक्षीने तपासून पाहिली पाहिजे व पुराव्याने शाबीत केली पाहिजे.

मग असे वाटू लागते की मुस्लिमांचा अनुनय करण्याची मुरलेली सवय कुरुंदकरांनीदेखील नकळत उचलली नसेल ना? पुढली काही विधाने पाहिली की ही कुशंका गडद होऊ लागते. हिंदु-मुस्लिम दंग्यांची चर्चा करताना कुरुंदकर लिहितात, 'दंगलीचे तात्कालिक निमित्त विचारात घेतले तर झालेल्या दंगलीत ७०–७५ टक्के दंगली मुस्लिम समाजापासून सुरू होतात, ही कटू वस्तुस्थिती आहे...पण खरा प्रश्न पहिला दगड मारणाऱ्याचा नसतो, त्याला दगड मारणे आवश्यक वाटेल असा प्रक्षोभ निर्माण करणाऱ्याचा असतो.' ही विधाने तर्कदुष्ट आहेत. 'दगड मारणे आवश्यक वाटेल' हे शब्द विचारवंताच्या लेखणीला शोभत नाहीत. दगड मारणे म्हणजे कायदा हातात घेणे आहे आणि वरील विधान म्हणजे भावनेच्या प्रक्षोभाचे निमित्त करून कायदा हातात घेण्याचे केलेले समर्थन आहे. भावनेचा प्रक्षोभ हे निमित्त कायदा हाती घेण्यास समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने पुरेसे नसते. कारण या न्यायाने उद्या एखादा बलात्कार करणाराही म्हणेल, 'दोष माझा नाही. मला 'बलात्कार करणे आवश्यक वाटेल, अशा या स्त्रीच्या सौंदर्याचा व विभ्रमांचा दोष आहे.' खुनी म्हणेल, 'मला खून करणे आवश्यक वाटेल असा प्रक्षोभ निर्माण करणाऱ्याचा दोष आहे.' समाजविघातक आणि माणुसकी-शून्य कृत्य थंड डोक्याने आणि शांत मनाने कधीच होत नसतात. भावनांचा प्रक्षोभ झाल्यावरच ती होतात, आणि तरीदेखील ती निंद्यच असतात.

अर्थात असे मुद्दे या सबंध पुस्तकात अगदी थोड्या ठिकाणी उपस्थित होतात. बाकी सर्वत्र कुरुंदकरांच्या मुद्देसूद अचूक विश्लेषणाची प्रशंसाच करावीशी वाटते. 'समान नागरी कायदा हे सेक्युलॅरिझमच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे आणि आवश्यक असे पाऊल

आहे.' असे स्पष्ट विधान ते करतात तेव्हा तर त्यांच्याविषयीच्या पक्षपाताच्या कुशंका आपोआपच दूर होऊ लागतात व त्यांच्या मनमोकळ्या विचारमंथनाची साक्ष पटते. 'या देशात फुटीरपणाच्या वाढीला भाषावार प्रांतरचना कारणीभूत नाही, तर संधिसाधू पद्धतीने तिची झालेली अंमलबजावणी कारणीभूत आहे.' 'दुर्दैवाने असे आढळून येते की, भारतीय समाजवाद्यांना संघटनेचे महत्त्व कळत नाही.' यासारखी सडेतोड विधाने म्हणजे कठोर आत्मपरीक्षण आणि सत्यान्वेषक विचारशक्ती यांचे पुरावे ठरतात.

विशेष महत्त्वाचे म्हणजे, सत्यान्वेषी विचारप्रक्रियेच्या निमित्ताने केवळ कोरडी तत्वचर्चा या पुस्तकात कुरुंदकरांनी केलेली नाही. युवक संघटनेच्या रचनात्मक कार्याची मूलगामी चिकित्सा करून फार मोलाची नवी दृष्टीही त्यांनी दिलेली आहे. आजवर अस्पर्श्य राहिलेल्या कितीतरी महत्त्वाच्या समस्या आणि त्यातून युवक संघटनांच्या कर्तृत्वाला असणारी आव्हाने त्यांनी तेथे तपशीलाने उल्लेखिली आहेत. 'रचनेसाठी संघर्ष' हे संघर्षाचे नवे आणि आवश्यक स्वरूप त्यांनी युवकांसाठी प्रतिपादिले आहे.

कुरुंदकरांची विचारपद्धती आणि लेखनशैली सहृदयाची आहे. कर्कश पंडिताची नाही. बुद्धिगम्यता आणि मनोविश्लेषण यांचा समन्वय त्यामध्ये झालेला आहे. बाबासाहेबांनी बौद्ध धर्म (च)का स्वीकारला त्याचे कुरुंदकरांनी केलेले अचूक विश्लेषण यादृष्टीने आवर्जून पाहण्यासारखे आहे. हिंदू धर्मग्रंथाविषयी सूचित केलेले अपसमज गृहीत धरूनसुद्धा यातील सहृदयता नाकारता येत नाही. 'धारणात् धर्मः' या वाक्याचा रोख स्पष्ट करताना कुरुंदकर कठोर रोकड्या बुद्धिवादाचे दर्शन घडवितात, तर "मुळात मनातून माणसाला स्वातंत्र्याची भिती वाटते... म्हणूनच माणसे स्वातंत्र्याच्या गोष्टी बोलत असताना रोज दृढनिश्चयी आणि कठोर नेत्याची वाट पहात असतात." असे अप्रिय सत्यकथन करताना स्वच्छ विचारदृष्टी आणि मूलगामी विश्लेषण यांचे प्रत्यंतर घडवितात. पण यात कुठेही कर्कशता येत नाही. हे सगळे व्यासपीठावरचे भाषण वाटत नाही; तर एका जाणत्या सुहृदाने शांतपणे केलेले संभाषण वाटते "धार्मिक बाबी विटाळ समजून सोडून द्याव्यात असे मला वाटत नाही. त्या सार्वजनिक जीवनात आग्रहाने वापरून त्यातला धार्मिक आशय कमी करून टाकावा असे मला वाटते" अशी समजदार तडजोडीची व प्रबोधनाची संयमी वृत्ती त्यातून निर्माण होते. हुकूमशाहीचे विच्छेदन करून त्यातील दिखाऊ प्रलोभनांची व्यर्थता स्पष्ट करणे, या देशातील फुटीरपणाचे वर्गीकरण करून त्यामागील संघर्षांचा शोध घेणे, रशिया आणि अमेरिका यांची भारताचे राष्ट्रहितसंबंधित म्हणून तुलना करून त्याबाबत रशियाला झुकते माप देणे, वगैरे वादग्रस्त बाबतींतही हाच विदग्ध

समजदारपणा व डौलदार संयम दिसून येतो. आपल्या विचारांचे स्वातंत्र्य कटाक्षाने जपणारे कुरुंदकर येथे दिसतात. कठोर वस्तुनिष्ठा आणि प्रामाणिक आत्मनिष्ठा यांच्या सीमारेषा परस्परात विलय पावलेल्या दिसून येतात.

पुस्तक वाचून झाल्यावर मला तीव्रतेने वाटले की अशा तऱ्हेची प्रश्नोत्तररूप पुस्तके जास्तीतजास्त निर्माण झाली पाहिजेत. साहित्यशास्त्र, कलातंत्र, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र इ. कितीतरी शाखांमध्ये विचारांचा व प्रश्नांचा गोंधळच गोंधळ माजलेला असतो. विद्वानांची आग्रही मतांतरे या गोंधळात नित्य भर टाकत असतात. पण या विषयांत नव्याने प्रवेश करणाऱ्या जिज्ञासूला, विशेषत: तरुणांना या सर्व प्रश्नांची कुणीतरी एकदा स्वच्छ अनाग्रही वृत्तीने मूलगामी माहिती सांगणे फार जरुरीचे असते. कुरुंदकरांचा बऱ्याच ज्ञानशाखांचा भरपूर व्यासंग आहे. त्यांनीच हवे तर ही गरज पूर्ण करावी. कुणी त्याला 'गाईड' म्हणून खुशाल हिणवो, तरुणांच्या दैनंदिन जीवनपरीक्षेला फार उपयुक्त ठरणारी अशी अशी 'गाईडे' आज हवी आहेत. 'वाटा : माझ्या तुझ्या' हे त्या दृष्टीने फार महत्त्वाचे पुस्तक आहे. ◻

'वाटा : माझ्या-तुझ्या'
प्रा. नरहर कुरुंदकर
राष्ट्र सेवा दल प्रकाशन
पृष्ठे : १०१
किंमत : चार रुपये


**'माणूस' चा व्हिएतनाम विशेषांक वाचलात ?**

त्या पार्श्वभूमीवर 'सुधन्वा' मासिकाच्या मार्च १९७३ अंकापासून चालू झालेली श्री. रा. म. शास्त्री यांची

**व्हिएतनाम**
**अर्थ आणि अनर्थ**

ही लेखमाला आपणांस खचित रोचक व माहितीपूर्ण वाटेल.

**सुधन्वा मासिक**
द्वारा, सुप्रिया एंटरप्राइजेस
उद्योग भवन, ले. ज. रोड
मुंबई २८.

ह्या वर्षीची ‘फिल्म-फेअर’ ॲवॉर्डस्

# कोईभी माल उठाओ एक लाख रुपया

प्रदीप दीक्षित

आजकाल मुंबईच्या एकुण ‘सखाराम’, ‘घाशीराम’, ‘वंदे मातरम्’ इ. वादग्रस्त वादळी वाऱ्यात ‘फिल्म-फेअर ॲवॉर्डस’बाबत आणखी एक नवीन भर पडली आहे. परंतु मंडळी जरी अस्वस्थ झाली असली तरी, वाद घालण्याच्या मुडात नाहीत, कारण एकेकाळी चित्रपटसृष्टीत ज्या ॲवॉर्डस्ना बहुमान, किर्ती आणि विजयाचे प्रतीक मानले जात असे, त्यालाच आता सतत अनेक वर्षे होणाऱ्या ॲवॉर्डस्च्या निकालापायी, ‘कोईभी माल उठाओ, एक लाख रुपया’ इथपर्यंत टवाळीला तोंड द्यावे लागत आहे.

कारण उघड आहे—नको त्या मतदानाचे ‘कोलित’ अपात्र लोकांच्या हातात—आणि मग त्यांनी बहुमताने ठरविलेल्या ‘निवडीबाबत’ पुन्हा त्याच लोकांचा वाईटपणा अंगावर घ्यायचा!

ही ॲवॉर्डस् ठरविण्याची पद्धत सर्वश्रुत आहेच. पाक्षीकातून आलेल्या छापील फॉर्मस्‌वर वाचकांनी आपली पसंती लिहून कळवायची. त्या बहुमतातून उत्कृष्ट (?) असे जे तीन चित्रपट असतील त्यातून ‘अतिउत्तम’ (हसू नका!) ठरविण्यासाठी आणखी एका कमिटीचा फार्स. निष्फळ? ह्या वर्षीच्या ‘पाकिजा’, ‘अनुभव’ आणि ‘बेईमान’ ह्यात सर्वोत्कृष्ट चित्रपट ‘बेईमान!’ मतदार आता विश्वामित्री पावित्र्यात उभे तर, बिचाऱ्या पाक्षिकाची स्थिती मेनकेपेक्षाही वाईट!

लोकांना आणि वाचकांना ह्यात नाविन्य वाटत नाही, कारण त्याच पाक्षिकात, त्यांचे परीक्षक, ज्या चित्रपटावर एक, दोन अथवा तीन असे स्टार्स देऊन, कडाडून ताशेरे चढवितात, त्याच चित्रपटावर फिल्म-फेअर ॲवॉर्डस्चा वर्षाव हा परंपरागत जुना विनोद झाला आहे.

दुसरे म्हणजे, ॲवॉर्डस् वाटण्याबाबत! गेले कित्येक वर्षे ‘शंकर-जयकिशन बॅंड कंपनी’ला शपथपूर्वक नित्यनियमाने एक ॲवॉर्ड ठेवलेले!

आणि त्याचमुळे की काय 'जय बोलो बेईमानकी'च्या जयघोषात 'पाकिजा'ची एकापेक्षा एक सुमधुर गाणी ह्यांच्या हृदयाचा छेद घेऊन गेली नाहीत ! काहीजणांच्या मते, शंकर-जयकिसन-वाल्यांना 'बाजवा रे बाजवा'साठी एक खास (गुणवत्ता आणि लोक-प्रियतेच्या मृत आत्म्याच्या शांती-प्रित्यर्थ) अवॉर्ड दर वर्षी देऊन पाकिझा-वर तरी अन्याय टाळायचा होता !

बनवेगिरीसाठी बदनाम असलेल्या चित्रपटसृष्टीशी संबंधित, मते माग-विण्याचा प्रकारसुद्धा किती हलगर्जी आणि बेसावधपणे हाताळला जातो ते पहा. मतपत्रिका पाक्षिकातून अशा खिरापतीसारख्या वाटल्याने, एक गठ्ठ्याने विकत घेऊन, आकाशवाणी-वरील 'झुमरीतलय्यासे' प्रकार होतो आणि एकच व्यक्ती हजारो अंक विकत घेऊन, वेगवेगळ्या नावाने भरून पाठविते, अशी कित्येक वर्षांची बोंब आहे. त्यावर उपाय म्हणून (म्हणे !) त्यांनी वेगवेगळ्या रंगाचे फॉर्म्स काढले आहेत आणि त्यांना जर विशिष्ट रंगाचे फॉर्मस्, एकाच व्यक्तीकडून आल्याचे आढळल्यास ते फॉर्म्स रद्द करण्यात येतात (म्हणे !)


आणि ही सर्व काळजी घेऊन 'बेईमान'सारख्या चित्रपटाला अॅवॉर्ड देऊन ह्या निष्काळजी निष्पन्नाची सांगता होते, असेच समजावयाचे ना ?

त्यातल्या त्यात तांत्रिक नैपुण्याबाबत अॅवॉर्डस देण्याची पद्धत त्या मानाने पुष्कळच चांगली आहे. म्हणजे चित्रपट सृष्टीतील विविध तांत्रिक संघटनांकडून त्याची मते छापील फॉर्म्सवर माग-विण्यात येतात व त्यांनी एकमताने निवडलेल्या चित्रपटाला विविध तांत्रिक कारागिरीची फिल्मफेअर अॅवॉर्डस देण्यात येतात.

फिल्म फेअर अॅवॉर्डस्मागील कला आणि कलाकार उत्तेजनाचा हेतू लक्षात घेता असे अविश्वासाचे संशयास्पद वातावरण निर्माण होणे खेदजनक. कारण अॅवॉर्डस्मधील उमद्या, होतकरू आणि महत्त्वाकांक्षी कलाकाराला ह्या मार्गे पुढे आणण्याची ताकत संपली की, त्याचे महत्त्व ओसरते आणि त्याचे रूपांतर 'लगातार ३ साल' इ. अवास्तव गोष्टींना महत्त्व येऊन त्याचा अॅवॉर्ड मिळणे आणि मिळविणे हा प्रेस्टीज इशु झाला की, त्याचे महत्त्व कमी होऊन पैशात फक्त किंमत वाढते. नेमके हेच ह्या अॅवॉर्डस्बाबत होऊ पहात आहे.

मला वाटते, आता ह्या लोकांनी अॅवॉर्डस् देण्याबाबत आणि काही स्वीकारण्याबाबत लता मंगेशकरबाईंचा दृष्टिकोन आणि मोठेपणा अंगिकारावा.

● ● ●




'पॉश' संस्कृतीचं विच्छेदन

# सीमाबद्ध

अवधूत परुळकर

श्यामलेंदु. पीटर्स हिंदुस्थान या विजेचे पंखे बनवणाऱ्या इंग्लीश कंपनीतला सेल्स मॅनेजर. एका गगनचुंबी इमारतीत त्याचा पॉश फ्लॅट. फ्लॅटला शोभेल अशी पॉश बायको. आता त्यांना आठ-दहा वर्षाचा एक गोंडस छोकरा असणार, तो दार्जिलिंगसारख्या टुमदार शहरात हॉस्टेलमध्ये शिकत असणार हे उघड आहे. या श्यामलेंदुच्या घरी एक दिवस त्याची मेव्हणी येते. सुदर्शन. तिच्या मध्यमवर्गीय मनात श्यामलेंदुला एक नाजूक स्थान असते. अगदी तिच्या मोठ्या बहिणीच्या लग्नाच्या आधीपासून. सुदर्शनच्या आगमनाने श्यामलेंदुला, आपल्या सूटबूटाच्या शरीरात हृदय नावाची एक चीज असल्याची जाणीव होऊ लागते — खोलखोल तरंग अंतरंगात उमटू लागतात. नोकरीसाठी आलेली सुदर्शना श्यामलेंदुचं पॉश जग कौतुकानं न्याहाळत असते, आणि एक दिवस—श्यामलेंदूच्या जगाचं हिडीस स्वरूप तिच्या नजरेला पडते. बिझिनेस कॉंपिटीशन, प्रेस्टीज या शब्दांचा आब राखणाऱ्या या जगात माणूस नावाच्या चीजेला किती दुय्यम स्थान आहे याचा साक्षात्कार सुदर्शनाला होतो आणि त्या क्षणी श्यामलेंदुविषयीच्या तिच्या नाजूक भावना लोप पावतात.

आता चित्रपट काढावा, असं या कथानकात एव्हढं काय आहे? ... पण सत्यजित राय या कथानकावर सीमाबद्ध हा चित्रपट काढायचा ठरवतो तेव्हा या छोट्याशा कथानकातही विलक्षण विस्तृत आशय भरतो. याला कारण सत्यजितचे बोलके कॅमेरे.

नुसतं श्यामलेंदु 'पीटर्स हिंदुस्थान'-मध्ये सेल्स मॅनेजर आहे एव्हढं प्रस्थापित करायसाठी सत्यजित कॅमेराला काय काय कसरती करायला लावतो हे पाहिलं तरी याची साक्ष पटते.

'पथेर पांचली' पासून पडद्यावर सतत दारिद्र्याचं दर्शन घडवणारा दिग्दर्शक म्हणून सत्यजित प्रसिद्ध आहे. 'सीमाबद्ध'मध्ये मात्र त्यानं अथपासून इतिपर्यंत श्रीमंतीचं दर्शन घडवलेय. गंमत म्हणजे पूर्वी तो जेव्हा पडद्यावर दारिद्र्याचं दर्शन घडवत असे तेव्हा प्रेक्षकांना त्यातल्या माणसांच्या श्रीमंत मनाचं दर्शन घडे. 'सीमाबद्ध'मध्ये तो उच्चभ्रू लोकांचं श्रीमंती रहणीमान दाखवताना खऱ्या अर्थानं त्यांच्या दरिद्री मनाचं दर्शन घडवतो.

असो. 'सीमाबद्ध'मध्ये पॉश लाईफ'चं चित्रीकरण करण्यात सत्यजित आणि त्याचे साथी चांगलेच यशस्वी झालेत. मेजवान्या, कॅबेरे डान्स, स्वीमींग पूल, रेसकोर्स, आलिशान मोटारी, अवाढव्य

दिवाणखाने, टेलिफोनचा खणखणाट वगैरेंनी चित्रपट संपन्न आहे. या सर्व वातावरणात गुदमरलेली सुदर्शना शर्मिला टागोरनं व्यवस्थित उभी केली आहे. मध्यमवर्गातून पुढं येऊन उच्चवर्गात चांगल्यापैकी रुळलेला श्यामलेंदु जसाच्या तसा व्यक्त केला बोरुननी आहे.

सत्यजितच्या दिग्दर्शनाबद्दल काय लिहावं ? बड्या लोकांच्या जीवनातली रुक्षता, पोकळी मनावर ठसविण्यासाठी तो अधूनमधून रिकामा फ्लॅट आणि झुळझुळणाऱ्या पडद्यांची दृश्यच पेरत राहतो. व्यावसायिकाचे जग डोळ्यासमोर उभं करताना 'पीटर्स हिंदुस्थान' कंपनीच्या पंख्यांची जाहिरात करणारा दोन मिनिटांचा रंगीत जाहिरातपट दाखवून थक्क करतो.

बिझिनेसची कोसळायला आलेली प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी श्यामलेंदु हीन मार्गांचा अवलंब करतो. त्यात यशस्वी झाल्याबद्दल त्याला वरची 'पोस्ट' मिळते. सहकार्यांकडून, बायकोकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होतो. पण सुदर्शनावर एकंदर प्रकाराची जी प्रतिक्रिया होते त्याने तो पुरता हादरून जातो. चित्रपटाचा हा शेवट सत्यजित ज्या मार्गाने खुलवतो त्याला तोड नाही.

ऑफिसमधून खुषीत घरी परतल्यावर श्यामलेंदु बायकोच्या काँग्रॅच्युलेशन्सचा हसत हसत स्वीकार करतो आणि बढतीची वार्ता सांगायला सुदर्शनाला हाक मारतो–आतल्या खोलीतून निर्विकार मूक चेहरा घेऊन सुदर्शना येते. शेजारच्या कोचावर बसते. तिच्या हालचालीत कमालीचा थंडपणा असतो. पत्नीसाठी म्हणून आणलेलं घड्याळ श्यामलेंदुनं तिला भेट दिलं असत. थंडपणे ते मनगटावरलं घड्याळ काढून ती टीपॉयवर श्यामलेंदुपुढं ठेवते–वातावरण एकदम स्तब्ध नि शांत.

वातावरणातला हा थंडपणा प्रेक्षकांत शिरशिरी पसरवत जात असताना 'समाप्त'ची अक्षरं तरंगू लागतात.

सीमाबद्ध हा हृदय गमावून बसलेल्या उच्चभ्रू लोकांच्या जीवनाचं विच्छेदन करणारा चित्रपट आहे. स्वतःची कंपनीची अब्रू सांभाळताना हे बिझिनेसवाले कोणते गलिच्छ मार्ग हाताळतात–कोणत्या तडजोडी स्वीकारतात त्यांचं हे चित्रण आहे. दुर्दैवानं ते असायला हवं तितकं भेदक नाही.

फॅक्टरीत श्यामलेंदु कृत्रिम संप घडवून आणतो–तो कसा ? ते स्पष्ट होत नाही. कामगारांचा सहवास कॅमेरान का टाळलाय उमगत नाही. ते दाखवण्याच्या भरात चित्रपट भलतीकडेच भरकटला जाईल असं सत्यजितला वाटलं काय? श्यामलेंदुच्या कृष्णकृत्याचा सुगावा सुदर्शनाला कसा लागला हेही दिग्दर्शकानं प्रेक्षकांच्या कल्पनाशक्तीवर सोपवलंय.

पण तरीही एकेकाळी फुटक्या भिंती फाटके पडदे दाखवत घरातून गलीच्छ गल्लीबोळातून फिरणारा सत्यजितचा कॅमेरा आताशा झिरझिरीत रेशमी पडदे दाखवत दाखवत फ्लॅटमधल्या 'पॉश' लोकांच्या फाटक्या मनावर स्थिरावतो आहे; हे पाहण्यात एक 'और मझा' आहे. ● ● ●

# आक्रांत

## उत्कट, निःशब्द आणि थोडासा निर्जीव

आयुष्याला सामोरे जातांना, प्रत्येकाने स्वतःचा दृष्टिकोन, एक विशिष्ट मार्ग आणि काही मूल्ये ही स्वतःची स्वतः ठरवायची असतात, किंबहुना एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून जगायचे असल्यास ठरवावित. परंतु आजच्या अविरत आणि अविश्रांत धावणाऱ्या जगात सर्वात अधिक उपहास जर कुठल्या भावनेचा होत असेल तर नेमका ह्याचाच आणि अशा भावना बाळगणाऱ्याचा !

भावनाशून्य व कवडी मोल अशा माणसांची किंमत जेव्हा ध्येय, प्रेम आणि हक्क ह्यातून 'अहम्' शोधणाऱ्या एखाद्या उत्कट मनापेक्षा फार अधिक वाढते, तेव्हा त्या वाढत्या गर्दीत, अस्तित्वासाठी तडफडणाऱ्या एका मानवी आत्म्याचा हृदयद्रावक मुक, घुसमटणारा 'आक्रांत' म्हणजे श्री. गिरीश वैद्य ह्यांचा अस्वस्थ आणि अंतर्मुख करणारा सहज सुंदर चित्रपट.

आयुष्य जगतांना त्याला प्रश्न विचारायचे नसतात, उलट तसेच प्रश्नार्थक आयुष्य जगत राह्यचे असते. कारण ह्या प्रश्नांना उत्तर नसते, उत्तर गवसत नाही आणि नेमके ह्याच उत्तराचा शोध हेच आयुष्य झालेल्या, अमीत (प्रविण जोशी) ह्या तरुण, ध्येयवादी आणि हळव्या पत्रकाराची कथा आणि व्यथा म्हणजेच त्याचा गुदमरलेला 'आक्रांत.'

त्याची प्रेयसी सीमा. (जाहिरा) क्षणभर त्याच्या धीर, गंभीर आणि गूढ व्यक्तीमत्वाने भारावून त्याच्या प्रेमात पडलेली अशी अतिशय सुंदर लाघवी आणि हळवी तरुणी. पण त्याच्या 'मी' पणाच्या कक्षेत, आपल्या पलिकडेही कशाला आणखीन स्थान आहे हे उमगताच, व्यथित पण सावध होणारी आणि भावनेपलिकडे त्याला आयुष्य जगता येत नाही, तडजोड त्याला नामंजूर आहे हे कळताच, अस्तिव आणि आस्था नसलेल्या, आणि फक्त 'संख्येने' वाढणाऱ्या गर्दीत मिसळून जाऊन, त्याला विसरू पाहणारी—!

. तिकडे सर्व दिशा हरविलेला अमित, त्याच्या आयुष्यातून सीमा निघून गेल्याच्या कल्पनेने, अधिकच स्वतःला हरवून बसतो आणि माझ्या पातळीला येऊन, माझी किंमत ओळखण्याची, माझा आक्रांत ऐकण्याची ताकत, इच्छा आणि हिम्मत कुणातच नाही ह्या दुखाःने अंतर्मुख होऊन अक्षरशः बेफाट बिनसून शेवटी वेडा होतो——

सीमा आणि अमीत ह्यांच्यातील



तरुण ध्येयवादी, हळवा अमीत आणि त्याचा आक्रांत समजू न शकणारी सीमा

एक सांधणारा दुवा म्हणजे अमितचा मित्र सुरेश. सुरेश हा नाकापुढे चालत जाऊनसुद्धा सीमा आणि अमितसारख्या ध्येयवादी, हळवे आणि बेछुट आयुष्य जगणाऱ्यांना सहानुभूती, आदर आणि प्रेम बाळगणाऱ्या समाजाचा प्रतिनिधी. तो दोघांमधील कम्युनिकेटर. मात्र तेवढाच. अगदी टेलिफोन! फक्त 'ऐकणे' आणि 'ऐकविणे', 'सांगणे' मुळीच नाही.' त्यामुळे चित्रपटाचा काही भाग निर्जीव.

अत्युच्च पण आंधळा ध्येयवाद आणि अति कॅलक्युलेटीव्ह प्रेम! परिणती–उद्विग्नतेपायी आत्महत्या–त्याचे समाजाच्या दृष्टिकोनातून मोजमाप? एक वृत्तपत्रीय बातमी–

'अमित ह्या तरुण पत्रकाराची आत्महत्या–हॉस्पिटलमधून नर्सच्या हलगर्जीपणामुळे, वेडाच्या झटक्यात पळून जाऊन समुद्रात आत्महत्या. नर्सवर खटला भरण्यात आला आहे.'

–ही बातमी असलेला पेपर दाराच्या खालच्या फटीतून आत सरकला आहे. त्याचवेळी कॉलबेल, घड्याळाचा अलार्म घणघणतो आहे. त्यावरून कॅमेरा पॅन होत, बिछान्यावर उशीला कवटाळून शांत निजलेल्या सीमावर स्थिरावतो. पुन्हा त्या बातमीवर कॅमेरा झूम होताना आपल्याला अनेक दिवसांचे पेपर्स तसेच पडलेले दिसतात आणि–सीमाने झोपेच्या गोळ्या घेऊन आत्महत्या केली आहे, हे त्यावरून सूचित करीत अंगावर काटा उभा करून हा चित्रपट संपतो.

ह्या चित्रपटात आणखी बघण्या-

साउखी, एक अत्यंत काव्यमय आणि प्रतिकात्मक गोष्ट म्हणजे समुद्र. नायकाचे आणि समुद्राचे नाते, दोघांचा 'आक्रांत' त्यांची जवळीक अगदी संभाषण वाटावे इतक्या सुरेख पद्धतीने दिग्दर्शक गिरीश वैद्य ह्यांनी टिपले आहे. अमित चिर-निद्रा घेतो ते ह्या समुद्राच्या कुशीतच. निसर्ग आणि मानसिक आंदोलने ह्यांचा कुठेतरी अर्थ समुद्राच्या लाटा वेगवेगळ्या पद्धतीने घेऊन फार सुंदर कल्पकता साधली आहे.

अभिनयाबाबत : सर्व अभिनेत्यांची भूमिकेची समज, बेअरिंग उत्तम आणि समतोल. सर्वच गुणी कलाकार. तसेच तांत्रिक दृष्ट्या कुठेही अतिरेक नाही आणि आखडता हात नाही. विषयाशी अनुरूप कृष्ण-धवल प्रकारात सुंदर चित्रीकरण. विशेषतः समुद्रावर लावलेले सर्व अँगल्स अप्रतिम. तीच बाब ध्वनी-बाबत. सर्व संवाद, मूड निर्माण करणारे आणि घालविणारे. दैनंदिन जीवनातील सर्व काही, अतिशय बारकाव्याने आणि कौतुकास्पदरीत्या घेतले आहे.

फिल्म फायनान्स कॉर्पोरेशनच्या आर्थिक साह्याने, सर्वांना संपूर्ण समज-णारा सर्वांग सुंदर चित्रपट म्हणून 'आक्रांत' अभिनंदनीय.

—प्रदीप

# महाराष्ट्र यूथ डेव्हलपमेंट कोअर
# जिवंत मनाच्या युवकांना आवाहन

देशाचा विकास मंद गतीने चाललाय्. शहारे आणि ग्रामीण विभाग यामध्ये दरी पडतीय्. शहरी आणि ग्रामीण माणसे एकमेकांना ओळखेनाशी झाली आहेत.

आणि शहरात शैक्षणिक कारखान्यातून तरुण तयार होत आहेत. हजारो, लाखो. एका साच्यातले, एका छापाचे. नोकरीसाठी वणवण फिरताहेत आणि त्यांच्या लक्षात येतय् जे शिक्षण आपण घेतले ते भंकस आहे. पुस्तकी आहे. या मातीशी त्याचा संबंध नाहीय्. या शिक्षणाने या देशातील सध्याच्या परिस्थितीचा अन्वयार्थ मला लावता येत नाही. या परिस्थितीशी मुकाबला करायचे सामर्थ्य मला मिळू शकत नाही. या खितपत पडलेल्या देशाला प्रगतीकडे, विकासाकडे नेण्यासाठी मार्ग कोणता याचे उत्तर मला सापडत नाही. मला ही कोंडी फोडली पाहिजे. मला जिवंत शिक्षण मिळाले पाहिजे. धगधगते जीवन मी पाहिले पाहिजे.

आणि हे वास्तव जीवन पहायचे असेल तर त्याला ग्रामीण भागात गेले पाहिजे. स्वातंत्र्याला २५ वर्षे होऊन गेली. शहरे वाढली, माजली, पण तुलनेने ग्रामीण भाग तसाच राहिला. नव्या विज्ञानाचा, नव्या सामाजिक जाणीवांचा प्रकाश तेथे

पोचलाच नाही. खऱ्या अर्थाने स्थानिक नेतृत्व निर्माण झालेच नाही. जे शेत-मजूरांच्या गरीब शेतकऱ्यांच्या, दलितांच्या प्रश्नांना वाचा फोडेल त्यांचा आवाज गर्जून सत्ताधाऱ्यांपर्यंत पोचवेल. त्यांच्या समस्यांचे प्रतिनिधित्व करेल. कारण त्यांना लोकशिक्षण मिळालेच नाही. सामाजिक शिक्षण, राजकीय शिक्षण यांचे संस्कार त्यांच्यावर झालेच नाहीत. सरकारी, निमसरकारी संस्था त्यांच्यापर्यंत पोचू शकल्या नाहीत.

महाराष्ट्र यूथ डेव्हलपमेंट कोअरने ही संधी तरुणांना देऊ केली आहे. ही एक स्वायत्त संस्था आहे. शिक्षण मंत्रालयाचा आणि काही सामाजिक संस्थांचा हिला पाठिंबा मिळालेला आहे. पदवी घेतल्यानंतर नव्या जीवनाला सुरुवात करण्यापूर्वी एक वर्ष तरुणांनी ग्रामीण विकासाच्या कार्याला द्यावे अशी कल्पना आहे. ग्रामीण भागात राहिल्यामुळे तेथील समाजाच्या जडणघडणीची प्रत्यक्ष माहिती युवकांना मिळू शकेल. मूलगामी समाजपरिवर्तनाचे काम करायचे असले तर तेथील समाज-रचनेचे विश्लेषण करता येणे ही कार्याची पहिली पायरी ठरते. मगच त्यानुरूप योग्य ती कामे हाती घेता येतील. युवकांना स्वत:च्या जीवनानुभवात भर घालण्याची अपूर्व संधी मिळेल. युवक आणि ग्रामीण भागात पूल सांधला जाईल.

या युवक युवतींच्या रहाण्या जेवणाचा खर्च करण्याची जबाबदारी एम्. वाय्. डी. सी. उचलणार आहे. एकच गोष्ट—या युवकांमध्ये मुसमुसत्या उत्साहाबरोबरच स्वच्छ, संशोधक दृष्टी हवी. तरच तेथील परिस्थितीशी समरस होऊन, स्थानिक गरजांचा अभ्यास करून जाणीवपूर्वक स्थानिक लोकांना विकासाच्या कार्यात भाग घ्यायला लावणे शक्य होईल.

तेव्हा असा पुढाकार घेऊन इच्छिणाऱ्या युवक युवतींना (शक्यतो पदवी परीक्षेला बसत असलेले किंवा उत्तीर्ण झालेले) या कार्यक्रमात भाग घेण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. जूनमध्ये प्रशिक्षण कोर्स सुरू होईल. ऑगस्ट-सप्टेंबर पासून ग्रामीण विभागातील प्रत्यक्ष कार्य सुरू होईल. अर्जाची प्रत खालील पत्त्या-वरून मागवून घ्यावी आणि १५ एप्रिल १९७३ पर्यंत पोचतील या बेताने अर्ज पाठवावेत. विद्यार्थिनींनी या कार्यक्रमात जरूर भाग घेतला पाहिजे. आपल्याकडील स्त्री समाज अतिशय मागे आहे. त्यांना पुढे आणणे आणि सामाजिक व्यवहारात भाग घ्यायला लावणे आवश्यक आहे. विद्यार्थिनी हे काम अधिक सहजपणे करू शकतील. स्फूर्ति देतील.

पत्रव्यवहाराचे पत्ते—

१ : छाया दातार, ९ ज्युथिका, मकरंद सहनिवास, वीर सावरकर मार्ग,
माहीम, मुंबई १६

२ : मनु पपिया, १५ जे. मेहता मार्ग, मुंबई ६.

## सप्रेम नमस्कार....

पृष्ठ ४ वरून

ळींना माझाच नव्हे तर सर्वसामान्य भारतीय नागरिकांचाही विरोध आहे.

बर्वे यांची ही बंदुकनिष्ठ भूमिका दृष्टिआड करून तिन्ही पत्रलेखक माझ्या विधानांचा अन्वय लावण्यास बसले म्हणून त्यांचा गोंधळ झाला.

लोकशाही ही अजूनही भांडवलशाही व्यवस्था आहे असे मानणाऱ्या बर्व्यांना, भारतामध्ये लोकशाही नसेल तर आनंदच वाटावयास हवा. त्याऐवजी त्यांनी लोकशाहीच्या खऱ्याखोट्याची चिकित्सा व्यक्तिगत अनुभवावरून करण्याचा अप्रामाणिक आविर्भाव आणला यामुळे मला जरा फसवेगिरी करून का होईना त्यांचे खरे स्वरूप शोधावे लागले.

येथील लोकशाही अपूर्ण आहे, नोकरशाही संथ, भ्रष्ट व क्वचित सूड-बुद्धीची आहे, न्यायसंस्था दीर्घसूत्री आहे हे मला वाटते कोणीही अमान्य करणार नाही. त्यावरचा उपाय, सातत्याने व निस्पृहपणे व्यापक लोकशिक्षण करीत राहणे हा होय. बर्वे यांनी या भूमिकेतून काही मूलभूत सवाल उपस्थित केले तर मी त्यांची पाठच थोपटीन.

बंदुकीची नळी ही आपल्या अत्यवस्थ लोकशाहीची ऑक्सिजनची नळी ठरू शकेल असे त्यांना वाटत असेल तर त्यांना व त्यांच्या विचारसरणीच्या प्रत्येकास माझा व बहुसंख्यांचा विरोध राहील हेही स्पष्ट करतो.

निवडणूक पद्धतीत व्यक्तिऐवजी पक्ष निवडून देण्याची पद्धत, पक्षबदलावर प्रभावी उपाय, किमान आर्थिक कार्यक्रम झपाट्याने अंमलात आणण्यासाठी निष्ठावंत कार्यकर्ते व तंत्रज्ञ यांची व्यापक यंत्रणा, भावनिक मुद्यावरील प्रत्येक असहिष्णुता त्याज्य मानण्याची प्रथा व जनतेला या लोकशाही परिवर्तनात काही झीज सोसावी लागेल याची तीव्र जाणीव या गोष्टी आपल्या लोकशाहीस सावरू शकतील. हे व असे उपाय वारंवार लोकांसमोर मांडणारे पत्रकार, लोकनेते व विचारवंत हेच लोकशाहीचे आशास्थान आहे.

प्रत्येक वाचकाने राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, व इतिहास यांच्याशी तोंड ओळख करून घ्यावी ही शिर्के यांची सूचना चांगली आहे. कारण अखेरीस सुबुद्ध, विचारक्षम व काही तारतम्य असलेला नागरिक हाच निरोगी लोकशाहीचा कणा आहे. राज्यशास्त्र अर्थशास्त्र व इतिहास यांचे निरपेक्ष सार लहानातल्या लहान व दूरात दूर नागरिकापर्यंत, चालू घडामोडींच्या संदर्भात व परिभाषेत पोहोचविणे हेच वृत्तपत्राचे व पत्रकाराचे जीवितकार्य आहे अशी माझी श्रद्धा आहे.

माझे गेल्या दहावर्षातील सर्व वृत्तपत्रीय व अन्य लेखन याच एका प्रेरणेने झाले आहे एवढेच मी म्हणू शकतो.

कळावे, आपला,

१७, मार्च ७३ चंद्रशेखर मराठे

[बारा सवालांवरील चर्चा येथे थांबवलेली आहे. —सं.]

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH-649

आमची दोन विशेष प्रकाशने

डॉ. सुधीर फडके

## कोठे आणि कधीतरी

किंमत : दहा रुपये

अनिल अवचट

## पूर्णिया

सहा रुपये

राजहंस प्रकाशन

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर